रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २७०
www.ramprahar.com
शुक्रवार, १८ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## वक्फ सुधारणा कायद्याबद्दल दाऊदी बोहरा समाजाकडून आभार



**नवी दिल्ली :** दाऊदी बोहरा समुदायातील प्रतिनिधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गुरुवारी (दि. १७) भेट घेतली. केंद्रीय अल्पसंख्याकमंत्री किरेण रिजेजू या वेळी उपस्थित होते. बोहरा समाजातील लोकांनी वक्फ कायद्याला पाठिंबा दिला आहे. त्या अनुषंगाने पंतप्रधान मोदी यांचे आभार मानण्यासाठी ही भेट होती. वक्फ सुधारणा कायद्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि दीर्घकाळापासून प्रलंबित असलेली मागणी पूर्ण केल्याबद्दल ही भेट घेतल्याचे केंद्रीय मंत्री किरेण रिजेजू यांनी सांगितले. दाऊदी बोहरा समुदायातील लोकांनी पंतप्रधानांच्या सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या नाऱ्यावरही विश्वास व्यक्त केल्याचेही ना. रिजेजू म्हणाले.

अंतरंग
तळा तालुक्यात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार/२
निडी फाटक व बोगद्यासंदर्भात खा. पाटील यांची सूचना/५
ग्रामीण प्रीमियर लीगमध्ये आमडोशी संघ विजेता/८

### रयत शिक्षण संस्थेच्या विविध समस्या सोडविण्यासाठी बैठक

# सर्वतोपरी सहकार्य करणार -उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

आशिया खंडातील सर्वात मोठी शैक्षणिक संस्था असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या विविध समस्यांबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि. १७) मुंबईत महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत उपमुख्यमंत्री पवार यांनी संस्थेला शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासित केले.





मंत्रालयात झालेल्या या बैठकीस रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, थोर देणगीदार व मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, सचिव विकास देशमुख, आमदार दिलीप वळसे-पाटील, आमदार विश्वजित कदम, महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेश कुमार, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्था ७५०हून अधिक शाखा आणि या वर्षात सुमारे साडेचार लाख विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी अग्रगण्य संस्था आहे. श्रमप्रेमी शिक्षण ही संस्थेची खास ओळख आहे. संस्था समाजातील सर्व स्तरांतील लोकांना, विशेषतः सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास व वंचित घटकांना शिक्षण देण्यास कटिबद्ध आहे. आजच्या वेगाने बदलणाऱ्या जागतिक परिस्थितीत, सध्याच्या शिक्षण पद्धतीचा सर्व स्तरांवर पुनर्विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. जागतिकीकरण आणि उदारीकरणामुळे शिक्षण क्षेत्रातील संकल्पना आणि संदर्भ बदलले आहेत. त्यामुळे पारंपरिक अध्यापन पद्धतींपासून थोडेसे बाजूला जाऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि नव्या शिक्षणविधींचा स्वीकार करणे काळाची गरज बनली आहे. ही गरज ओळखून रयत शिक्षण संस्थेने नव्या प्रवाहांशी जुळवून घेण्याची प्रक्रिया सक्रियपणे सुरू केली आहे. **(पान २ वर..)**

## महाराष्ट्रात मराठी अनिवार्य, तर देशात संपर्कसूत्रासाठी हिंदी व अन्य भाषा -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात प्रत्येकाला मराठी भाषा आली पाहिजे हा आमचा आग्रह आहे. त्यासोबत देशात संपर्कसूत्र हिंदी भाषा आहे. त्यामुळे ती लोकांनी शिकावी. याशिवाय कोणाला इंग्रजी आणि अन्य भाषा शिकायची असेल तर मनाई नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ते गुरुवारी (दि. १७) प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

या वेळी मुख्यमंत्र्यांनी नव्या शैक्षणिक धोरणाबाबत भूमिका मांडली. राज्यात यंदाच्या वर्षापासून लागू करण्यात येत असलेले शैक्षणिक धोरण हे नवे नाही. ते यापूर्वीच निश्चित झाले होते. या संदर्भात कोणताही नवा शासन आदेश लागू झालेला नाही. शैक्षणिक धोरणानुसार शाळांमध्ये करण्यात आलेली हिंदी भाषेची सक्तीचा निर्णय हा व्यापक दृष्टिकोनातून घेतला असावा, असे मत त्यांनी मांडले.

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिलीपासून नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होईल, तर पुढील वर्षी दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावी इयत्तेसाठी नवे शैक्षणिक धोरण लागू करण्यात येईल. २०२८-२९पर्यंत राज्यात बारावीपर्यंत सर्व इयत्तांसाठी नवे शिक्षण धोरण लागू असेल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## राज्य शासनाच्या चित्रपट पुरस्कारांची घोषणा

■ महेश मांजरेकर, अनुपम खेर, काजोल देवगण, मुक्ता बर्वे यांचा सन्मान

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या चित्रपट पुरस्कारांची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी गुरुवारी (दि. १७) केली. या पुरस्कारांचे वितरण २५ एप्रिल रोजी मुंबईतील एनएससीआय डोम येथे भव्य समारंभात होणार आहे.

या वर्षीचा चित्रपती व्ही.शांताराम जीवन गौरव पुरस्कार नामवंत अभिनेता, दिग्दर्शक व निर्माते महेश मांजरेकर यांना जाहीर झाला आहे. १० लाख रोख, स्मृतीचिन्ह, मानपत्र व चांदीचे पदक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार प्रसिद्ध अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना प्रदान करण्यात येणार असून या पुरस्काराचे स्वरूप सहा लाख, स्मृतीचिन्ह, मानपत्र व चांदीचे पदक असे आहे.



स्व.राज कपूर जीवन गौरव पुरस्कार प्रख्यात अभिनेते अनुपम खेर यांना, तर स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री काजोल देवगणला दिला जाणार आहे. या दोन्ही पुरस्कारार्थींना अनुक्रमे १० लाख व सहा लाख रुपये दिले जातील.

गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार यंदा मराठीतील ज्येष्ठ गझल गायक भीमराव पांचाळे यांना प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार १० लाख रोख रक्कम, मानचिन्ह, मानपत्र व शाल यांसह दिला जाणार आहे.

## शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांचे आज वितरण

**पुणे :** महाराष्ट्र शासनाचा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आयोजित शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराचे शुक्रवारी (दि. १८) सकाळी ११ वाजता वितरण होणार आहे. पुणे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात हा सोहळा रंगणार आहे.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुरस्कार समारंभ होईल. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## स्कूल बसमध्ये चिमुकल्या मुलींचा लैंगिक छळ; नराधम क्लिनरला अटक

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधून शाळेत सोडण्यासाठी जाणाऱ्या बसमधील क्लिनरकडून अल्पवयीन मुलींचा लैंगिक छळ करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. करण दीपक पाटील (वय २५, रा. वदप, ता. कर्जत) असे नराधम क्लिनरचे नाव असून त्याला अटक करून बस जप्त करण्यात आली आहे.

खालापूर तालुक्यातील लोधिवली येथील सेंट जोसेफ स्कूलमध्ये शिकणाऱ्या कर्जतमधील विद्यार्थ्यांना ने-आण करण्यासाठी खासगी बससेवा आहे. या बसवर क्लिनर म्हणून करण पाटील हा तरुण काम करीत असून तो मुलींना ड्रायव्हरच्या मागील सीटवर बसायला सांगत असे. त्यानंतर त्यांना मांडीवर बसवून खासगी भागाला स्पर्श करायचा. नकार दिल्यास तर तो त्यांना मारायचाही.

गेले वर्षभर करण हा मुलींची लैंगिक छळवणूक करीत असल्याने त्रास असह्य झालेल्या एका पाच वर्षीय पीडितेने याबाबत आईला सांगितले, तेव्हा सारा प्रकार उघडकीस आला. पीडित मुलीच्या कुटुंबाने कर्जत पोलीस ठाण्यात धाव घेत आरोपीविरोधात तक्रार दिली. पोलिसांनी आरोपीला अटक केली.

दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी व फास्टट्रॅकवर घेऊन नराधमास फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी पालकांकडून तसेच भाजप व मनसेकडून पोलिसांकडे करण्यात आली आहे. यावर उपविभागीय पोलीस अधिकारी डी. डी. टेळे यांनी, आम्ही योग्य तपास करून दोषीवर कारवाई करू, असे म्हटले आहे.

### निवडक

**भालाफेकपटू नीरज चोप्राची नव्या हंगामात 'सुवर्ण' सलामी**

**पॉचेफस्ट्रूम :** भारतासाठी दोन ऑलिम्पिक पदके जिंकणारा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्राने २०२५च्या हंगामाची विजयी सुरुवात केली. दक्षिण आफ्रिकेतील पॉचेफस्ट्रूम येथे झालेल्या पॉट इन्व्हिटेशनल ट्रॅक स्पर्धेत नीरजने सुवर्णपदकावर नाव कोरले. या स्पर्धेत त्याने ८४.५२ मीटर भालाफेक केली. नीरज सध्या चेक प्रजासत्ताकचे जान जेलेजनी या आपल्या नवीन प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे.

**सागर कारंडेची फसवणूक करणारा आरोपी अटकेत**

**मुंबई :** विनोदी अभिनेता सागर कारंडे याची फसवणूक करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ठाण्यातून अटक केली आहे. अक्षयकुमार गोपालन असे या आरोपीचे नाव असून त्याने इन्स्टाग्रामवर लाईकच्या बदल्यात पैशाचे आमिष दाखवून ६१ लाखांची फसवणूक केली, मात्र सागरने 'तो मी नव्हेच' असे म्हटले होते.

## आधी वडापावमध्ये साबण; आता उंदरांचा सुळसुळाट!

### कर्जत स्टेशनमधील उपहारगृहात प्रकार

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वेस्थानकातील स्टॉलवरून घेतलेल्या वडापावमध्ये साबण आढळून आल्याचा धक्कादायक प्रकार काही दिवसांपूर्वी समोर आला होता. याच स्टेशनमध्ये असलेल्या उपहारगृहात आता उंदरांचे साम्राज्य दिसून आले आहे. येथील खाद्यपदार्थांवर उंदरांचा सुळसुळाट असल्याचे एका ग्राहकाने सोशल मीडियाद्वारे उघड केले आहे.



कर्जत रेल्वे स्थानकातील वि.के.जैन या स्टॉलवर वडापावमध्ये कपड्याचा साबण आढळून आला होता. तोंडाला आलेला फेस पाहून ही घटना उघडकीस आली. यावर रेल्वे विभागाने कठोर कारवाईदेखील केली. त्यानंतर आता येथील दिवाडकर उपहारगृहात खाद्यपदार्थांवर दिवसाढवळ्या उंदीर ताव मारता दिसून आल्याने एका प्रवाशाने फोटो आणि व्हिडीओ शूट केले. यामध्ये उंदीर वेफर्स खाताना दिसत असून संपूर्ण परिसरात अस्वच्छता नसल्याचेही स्पष्ट होते. रेल्वे विभाकडून याची दखल घेण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

## महड विषबाधा प्रकरणात आरोपी महिलेला जन्मपेठ

**खोपोली : प्रतिनिधी**

सासरची लोक रंगावरून टोमणे मारतात या रागातून वास्तुशांतीच्या कार्यक्रमात जेवणात विषारी द्रव्य टाकून पाच जणांच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या प्रज्ञा ऊर्फ ज्योती सुरेश सुरवसे हिला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. ही खळबळजनक घटना १८ जून २०१८ रोजी खालापूर तालुक्यातील महड या तीर्थक्षेत्र गावी घडली होती.



महड येथील सुभाष रामचंद्र माने यांच्या घरात वास्तुशांतीच्या कार्यक्रमानिमित्त जेवण ठेवण्यात आले होते. या जेवणामध्ये विषबाधा होऊन कल्याणी प्रकाश शिगुडे (वय १७), ऋषिकेश शाहूराज शिंदे (वय १२), प्रगती श्याम शिंदे (वय १३), विजय श्याम शिंदे (वय ११), गोपीनाथ संभाजी नापुरे (वय ५३) या पाच लोकांचा दुर्दैवी अंत झाला होता तसेच १५पेक्षा अधिक जणांना उपचाराकरिता दाखल करण्यात आले होते.

सुरुवातीला अपघाताने डाळीमध्ये फोरेटसारखे औषध पडल्यामुळे ही विषबाधा झाली असावी असा अंदाज व्यक्त होत होता, परंतु खालापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांना प्रकरणात काळेबेरे असल्याचा संशय आला आणि त्यांनी साध्या वेशात महिला पोलीस कर्मचारी महड गावात तैनात केले होते. अतिशय बारकाईने आणि चातुर्यपूर्वक तपास करत आरोपी निष्पन्न केली गेली.

सुभाष माने यांच्या नात्यातील महिला प्रज्ञा उर्फ ज्योती सुरेश सुरवसे हिने तिला तिची सासू, नवरा, नणंद तसेच सुभाष माने व त्यांचे कुटुंबीय यांच्याकडून होणाऱ्या त्रासाचा बदला घेण्यासाठी त्यांना जीवे मारण्याचे ठरवले व त्यासाठी तिने वास्तुशांतीच्या कार्यक्रमासाठी बनवलेल्या जेवणातील डाळीमध्ये फोरेटसारखे विषारी औषध टाकल्याचे उघडकीस आले.

या गुन्ह्यामध्ये पनवेल सत्र न्यायालयाने आरोपी प्रज्ञा सुरवसे हिला भा.दं.वि. कलम ३०२ अंतर्गत जन्मठेप व २५ हजार रुपये अशी शिक्षा, भा.दं. वि. कलम ३००७मध्ये जन्मठेप व २५ हजार रुपये अशी शिक्षा आणि भा.दं.वि. कलम ३२८मध्ये २० वर्षे कारावस आणि २५ हजार रुपये दंड अशी शिक्षा जाहीर केली.

पनवेल सत्र न्यायालयात सरकारी पक्षातर्फे ॲडव्होकेट सी. वाय. पाटील यांनी बाजू मांडली, तर पोलीस शिपाई स्वप्नील पानसरे यांनी पैरवी अधिकारी म्हणून काम बजावले.

## उन्हाळी सुट्टीसाठी एसटी सज्ज!

### रायगडमधील सात आगारातून १६ जादा बसेसचे नियोजन

**अलिबाग : प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये अनेक जण आपल्या गावी जातात. त्यामुळे प्रवाशांच्या सेवेसाठी राज्य परिवहन महामंडळ रायगड विभागामार्फत मध्यम व लांब पल्ल्याच्या एसटी बसेस १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत सुरू केल्या जाणार असल्याची माहिती विभाग नियंत्रक कार्यालयाकडून देण्यात आली आहे.



सध्या अनेक विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपल्या आहेत. त्याचप्रमाणे पर्यटकांचीही रायगड जिल्ह्याला पसंती असल्याने अनेक जण फिरण्यासाठी येतात. प्रवाशांना त्यांच्या निश्चितस्थळी सुखरूप जाता यावे यासाठी एसटी महामंडळ रायगड विभागाकडून अलिबाग, श्रीवर्धन, कर्जत, रोहा, मुरूड, माणगाव, महाड या सात आगारांतून १६ जादा बसेस सोडल्या जाणार आहेत.

अलिबाग-बार्शीमार्गे अहमदपूर, अलिबाग-कल्याणमार्गे जळगाव, श्रीवर्धन ताम्हिणीमार्गे तुळजापूर, श्रीवर्धन-कल्याणमार्गे शिर्डी, हरेश्वर-स्वारगेटमार्गे अक्कलकोट, श्रीवर्धन अहिल्यानगरमार्गे औरंगाबाद, कर्जत-वाशीमार्गे तुळजापूर, रोहा-माणगाव-बार्शीमार्गे लातूर, रोहा-माणगावमार्गे धाराशिव, रोहा पाली-अहिल्यानगरमार्गे बीड, मुरूड खोपोलीमार्गे छत्रपती संभाजीनगर, मुरूड-खोपोली-बार्शीमार्गे लातूर, माणगाव-बार्शीमार्गे अहमदपूर, महाड-बोरिवली, श्रीवर्धन-बोर्लीमार्गे नालासोपारा अशा फेऱ्या वेगवेगळ्या वेळेनुसार असणार आहेत.

उन्हाळी सुट्टीमध्ये दरवर्षी प्रवाशांच्या सेवेसाठी जादा एसटी बस फेऱ्या सोडल्या जातात. यावर्षीदेखील १५ एप्रिलपासून नियोजन केले गेले आहे. अलिबागसह माणगाव, महाड, श्रीवर्धन, मुरूड, रोहा, कर्जत या आगारातून या बसेस सोडण्यात येणार आहेत. या फेऱ्यांचा जास्तीत जास्त प्रवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विभाग नियंत्रक दीपक घोडे यांनी केले आहे.

**सवलतीमुळे पसंती**

उन्हाळ्यामध्ये अनेक कुटुंबे बाहेरगावी आपल्या नातेवाईकांकडे जाण्यासाठी एसटीला सर्वाधिक पसंती देत आहेत. एसटी महामंडळाने महिला, वयोवृद्ध प्रवाशांसाठी खास सवलत आणल्यामुळे याचा सर्वाधिक लाभ प्रवाशांना होत आहे. त्यामुळे मागील काही महिन्यांपासून एसटी बसला सर्वाधिक गर्दी होताना दिसून येत आहे.

## अलिबाग-रेवस मार्गावर अपघात; पती-पत्नीचा मृत्यू

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-रेवस मार्गावर मानीफाट्याजवळ गुरुवारी (दि. २) इनोव्हा कारने दुचाकीला मागून धडक दिली. या अपघातात नवेदरबेली येथील पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला. विश्वास पाटील, कल्पना पाटील अशी अपघातात मृत्युमुखी पडलेल्या दोघांची नावे आहेत.



विश्वास पाटील आणि कल्पना पाटील दुचाकीवरून अलिबागहून रेवसच्या दिशेने जात होते. त्यांची दुचाकी मानीफाटा येथे आली असता मोटार कारने त्यांना धडक दिली. या अपघाताची माहिती मिळाल्यानंतर अलिबाग पोलिस घटनास्थळी पोहचले. अपघातात जखमी झालेल्यांना जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच पती-पत्नीचे निधन झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. अपघातानंतर संतप्त जमावाने कारची मोडतोड करत वाहतूक रोखून धरल्याने काही काळ वातावरण तंग झाले होते. पोलिसांनी अधिक फौजफाटा मागवून वातावरण शांत केले.

## रायगड पोलिसांनी जप्त केलेले अमली पदार्थ नष्ट

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलाकडून वर्षभरात जप्त करण्यात आलेले अमली पदार्थ नष्ट करण्यात आले. यात ५१ किलो गांजा आणि एक किलो ४७ ग्रॅम चरसचा समावेश होता. रासायनिक विश्लेषक आणि महाराष्ट्र प्रदुषण नियामक मंडळाच्या देखरेखीत ड्रग्ज नष्ट करण्यात आले.

रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रातील कर्जत, नागोठणे, नेरळ, पोयनाड, मांडवा सागरी, रेवदंडा, महाड तालुका, वडखळ, गोरेगाव, रसायनी, मुरूड, खोपोली या १२ पोलीस ठाण्याच्या हद्दीत अमली पदार्थ तस्करीच्या गुन्ह्यांची नोंद झाली होती. यात नार्कोटिक्स ड्रग्ज ॲण्ड सायकोट्रॉपीक सबस्टेन्सेस ॲक्ट अन्वये दाखल असलेल्या १५ गुन्हे दाखल करण्यात आले होते, ज्यात ५० किलो ९९२ ग्रॅम वजनाचा गांजा व एक किलो ४७ ग्रॅम वजनाचा चरस जप्त करण्यात आले होते.

जप्त केलेल्या अमली पदार्थांची एनडीपी ॲक्ट कलम ५२ अ (२)प्रमाणे कार्यवाही करून विल्हेवाट लावण्यात आली. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे बाळासाहेब खाडे यांच्या समितीच्या देखरेखीखाली तळोजा एमआयडीसीमधील मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. कंपनीत परिसरात हा मुद्देमाल नष्ट करण्यात आला.

या वेळी न्यायवैद्यकीय प्रयोगशाळा संचालनालय कलिना (मुंबई) येथील अ.स. गावकर, महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाचे क्षेत्रीय अधिकारी डॉ. गजानन खडकीकर, निरीक्षक, वैद्यमापन शास्त्र विभागाचे अधिकारी आणि दोन शासकीय पंच उपस्थित होते.

एकूण आठ लाख ४८ हजार ३१८ रुपये किमतीचा मुद्देमाल योग्य कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून नष्ट करण्यात आला.

# मेट्रो मार्ग ७ अ मधील भुयारी बोगद्याचे ब्रेक थ्रू पूर्ण

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती**



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (टी २) ते अंधेरी पूर्व या मेट्रो मार्ग ७ अ मधील १.६५ किलोमीटर लांबीच्या भुयारी बोगद्याचे ब्रेक थ्रू मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पूर्णकरण्यात आले. यावेळी कौशल,रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा,आमदार पराग अळवणी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी,अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीला अधिकाऱ्यांकडून प्रकल्पाविषयी माहिती जाणून घेतली. तसेच कळ दाबून 'ब्रेक थ्रू' कामाला सुरुवात केली. यानंतर या कामाची पाहणी केली. हाभुयारी बोगदा मेट्रो ७ अ वर डाऊनलाईन वर आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ स्टेशन ते एअरपोर्ट कॉलनी स्टेशन दरम्यान हा बोगदा असणार आहे. ही मेट्रो जोडणे मुंबई महानगर प्रदेशातील एकूण मेट्रो जाळ्यासाठी महत्त्वाचा टप्पा असणार आहे.

या मेट्रो मार्गामुळे मुंबई महानगर क्षेत्रातील मीरा-भाईंदर व पुढे वसई – विरार हा भाग छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळासोबत मेट्रोने जोडले जातील. तसेच ठाणे व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुद्धा मेट्रोने जोडण्यात येईल. या मेट्रो मार्गाचे ५९ टक्के काम पूर्ण झाले आहे.मेट्रो मार्ग ७ अ विषयी..या मेट्रो मार्गाची लांबी ३.४ किलोमीटर असून त्यापैकी उन्नत मार्ग ०.९४ किलोमीटर आणि भूमिगत २.५० किलोमीटर आहे. या मार्गावर दोन स्थानके असणार आहेत. एक स्थानक उन्नत मार्गावर एअरपोर्ट कॉलनी तर दुसरे स्थानक भूमिगत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे असणार आहे. उन्नत मेट्रो मार्ग ०.५७ किलोमीटर असेल दुहेरी बोगद्याची लांबी २.०३५ किलोमीटर आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये टीबीएम मशीन जमिनीपासून ३० मीटर खाली भूगर्भात उतरवण्यात आली.मेट्रो मार्ग तीनच्या वरून, सहार उन्नत रस्त्यांच्या पायाखालून, मोठ्या सांडपाणी वाहिन्या वजलवाहिन्यांना क्रॉस करून विविध अडचणींवर मात करून या बोगद्याचा ब्रेक थ्रू पूर्ण करण्यात आला. यामेट्रो मार्गामुळे मुंबईकरांना कुलाबा ते वसई विरार, मीरा भाईंदर पर्यंत आरामदायी प्रवास अनुभवता येणार आहे.

या मार्गामुळे मुंबई महानगर प्रदेशातील विविध मेट्रोमार्ग थेट विमानतळापर्यंत मेट्रोने जोडलेजातील. मेट्रोमार्ग ३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) च्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ याभूमिगत स्थानक मार्गासोबत सुलभ संलग्न करणे शक्य होईल. प्रवाशांसाठी सुरक्षित आरामदायी व सुलभप्रवास शक्य होणार आहे. दाटीवाटीच्या नागरी परिसरातून मेट्रोसाठी उन्नत व भूमिगत मार्गाची रचनाकेल्यामुळे विमानतळ परिसरात मेट्रो बांधकामासाठी कमी जागा व्यापली जाणार आहे.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

## तळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपीवर तळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे .




तळा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बुधवार दिनांक १६ एप्रिल रोजी दुपारी १ च्या सुमारास तळा तालुक्यातील एका घराचे दुरुस्तीचे काम सुरू असलेल्या ठिकाणी आरोपी याने पीडित मुलगी ही अल्पवयीन असल्याचे माहित असून सुद्धा तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला

तळा पोलीस ठाणे येथे आरोपी विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना घडल्यानंतर माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी सूर्यवंशी यांनी घटनास्थळी भेट दिली असून याचा अधिक तपास तळा सहाय्यक पोलिस निरीक्षक सतीश गवई करत आहेत.

# मासळीची आवक कमी झाल्याने होड्या किनारी; सतत तीन वर्ष दुष्काळजन्य परिस्थिती



**मुरुड : प्रतिनिधी**

कोकणातील ७२० किलोमीटर सागरी किनाऱ्यावर दोन सिलेंडर व चार सिलेंडर होड्यांची संख्या खूप मोठी आहे.मुरुड तालुक्यात सुमारे ७४० होड्या असून सध्या मुबलक मासळी मिळत नसल्याने.राजपुरी व आगारदांडा बंदरात मोठ्या संखेने बोटी किनाऱ्याला साकारण्यात आलेल्या आहेत.खोल समुद्रात जाऊन आठ ते १२ दिवस राहून सुधा मुबलक मासळी मिळत नसल्याने होणारा खर्च मच्छिमार यांना परवडत नसल्याने बोटी साकारण्याची वेळ एप्रिल महिन्यातच आली आहे.

समुद्राला १५ मे ला उधाण सुटते त्यामुळे बोट जास्त हेलकावे घेते. त्यामुळे खोल समुद्रात टिकाव लागत नाही.म्हणून पावसा अगोदरच बोटी साकारण्यात येतात.तर १ जून ते ३१ जुलै पर्यंत मासेमारी बंद असते. परंतु यंदा मासळी खोल समुद्रात हवामान बदलामुळे निघून गेल्याने मच्छिमारांना मुबलक मासे मिळत नाहीत.परिणामतः दहा ते बारा दिवस समुद्रात जाऊन होणारा डिझेल खर्च,बर्फ,भोजन व्यवस्था,मजुरी या व अनेक गोष्टी बाबतचा खर्च बोट मालक यांना सहन करावा लागत असल्याने या व्यवसायात तोटा सहन करून मच्छिमार कर्ज बाजारी होत आहे.

सलग तीन वर्षे ही वेळ येत असल्याची खंत मच्छिमार व्यक्त करीत आहेत.यंदा एक महिना अगोदरच होड्या किनारी लागल्या आहेत.त्यामुळे या व्यवसायाला मंदीची झळ बसत आहे.

या बाबत रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले की हवामान बदलले असून खोल समुद्रात जोरदार वारे वाहत आहेत.त्यामुळे मासळी खोल समुद्रात निघून गेली.पावसा अगोदरच ही परिस्थिती उद्भवल्याने मच्छिमार कर्जबाजारी होत आहेत. पावसाळी बंदी काळात तरी राज्य शासनाने समुद्र किनारी राहणाऱ्या कोळी बांधवांसाठी आकर्षक योजना आणून मच्छीमारांना दिलासा द्यावा अशी आग्रही मागणी केली आहे.

# शिवसमाधीच्या चौथऱ्यावर चढण्यास कायमस्वरूपी बंदी करा

## गड किल्ले संवर्धन समितीची पुरातत्व विभागाकडे मागणी

**महाड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असणाऱ्या किल्ले रायगड येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधी स्थळावरील अष्टकोनी चौथऱ्यावर चढण्यास कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी गड किल्ले संवर्धन समितीचे अध्यक्ष प्रसाद चंद्रकांत दांगट पाटील यांनी भारतीय पुरातत्व विभागाकडे केली आहे.



छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असणाऱ्या किल्ले रायगड येथे दररोज देश विदेशासहित राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो शिवभक्त व पर्यटक भेट देत असतात, त्याचप्रमाणे केंद्रातील व राज्यातील मंत्र्यांसहित देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री यांच्या सहित वेगवेगळ्या पक्षाचे पक्षप्रमुख यांनी रायगडावर भेट दिली आहे तर अनेकांनी यापूर्वी राजकीय कार्यक्रम देखील रायगडावर केले आहेत.

राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा व माजी कृषीमंत्री शरदचंद्र पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तुतारी या चिन्हाचे अनावरण केले होते यावरून मोठ्या प्रमाणावर शरद पवारांसहित त्यांच्या पक्षावर टीका झाल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असणाऱ्या किल्ले रायगड येथील राष्ट्रीय संरक्षित स्मारक असलेल्या आणि सर्व शिव भक्तांचे प्रेरणास्थान असलेल्या किल्ले रायगड येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीच्या (राज छत्री) अष्टकोनी चौथऱ्यावर चढण्यास कायमस्वरूपी बंदी घालावी अशी मागणी गड किल्ले संवर्धन समितीचे अध्यक्ष प्रसाद चंद्रकांत दांगट पाटील यांनी भारतीय पुरातत्व महासंचालक नवी दिल्ली येथे लेखी पत्राद्वारे केली आहे.

शिवछत्रपतींची राजधानी असलेल्या समाधी स्थळावर अष्टकोनी चौथरा हीच छत्रपती शिवाजी महाराजांची मूळ समाधी आहे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे येथिल छत्रीचे बांधकाम नव्याने केलेले आहे त्यामुळे अष्टकोनी चौथरावर कोणासही चढण्यास बंदी असावी सदर चौथ्यावर साफसफाई सुशोभीकरण यासाठी जावे लागते त्यासाठी नियम अटी असाव्यात, साफसफाई सुशोभीकरण करत असताना छायाचित्र काढण्यात सक्त मनाई असावी, असे छायाचित्र कोणत्याही माध्यमातून प्रकाशित झाल्यास सदर व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्याची पुरातत्त्व विभागाच्या नियमात तरतूद असावी तसेच भोवती संरक्षित रेलिंग असावेत याबाबत उपाययोजना करावी अशी मागणी गड किल्ले संवर्धन समितीचे प्रसाद चंद्रकांत दांगट पाटील यांनी केली आहे

# सिडकोमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोमध्ये शिवजयंती सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. सिडको एम्प्लॉईज युनियनतर्फे शिवजयंती सोहळ्याचे दिनांक १७ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, सिडको एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष नरेंद्र हिरे, सिडको एम्प्लॉईज युनियनचे उपाध्यक्ष संजय पाटील सिडको एम्प्लॉईज युनियनचे नितिन कांबळे, व सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धपुतळ्याचे पूजन करून व पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाली. शिवाजी महाराजांनी आपल्या रयतेची नेहमीच आपल्या कुटुंबाप्रमाणे काळजी घेतली. यासारखेच महाराजांचे अनेक गुण आहेत, ज्याबद्दल केवळ चर्चा केली जाते. परंतु महाराजांच्या अंगभूत गुणांपैकी एका गुणाचा तरी प्रत्येकाने आपल्या आयुष्यात अवलंब करावा असे आपले मनोगत श सुरेश मेंगडे यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अखेरीस सादर करण्यात आलेल्या मुजरा माझा महाराष्ट्राला या छत्रपती शिवाजी महाराजांच्य जीवनावर आधारित संगीतमय नाट्यकृतीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युनियनचे सहचिटणीस सुधीर कोळी यांनी केले.

# रायगड जिल्ह्यातील पहिले बीएससी नर्सिंग कॉलेज माणगावला

**माणगाव : प्रतिनिधी , बातमीदार**

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्याचे खासदार सुनील तटकरे यांच्या अथक प्रयत्नानंतर माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्रीमती विठाबाई मारुती गोगावले या बीएससी नर्सिंग कॉलेजला राज्य सरकारने मान्यता दिली आहे. अशा प्रकारचे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांची मान्यता मिळालेले रायगड जिल्ह्यातील पहिलेच कॉलेज ठरले आहे.



खासदार सुनील तटकरे यांनी संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे आणि समस्त माणगाकरांना येथील बीएससी नर्सिंग कॉलेजला मान्यता मिळवून देण्याचे वचन दिले होते. त्याची पुर्तता केल्याने ॲड. राजीव साबळे यांनी खासदार सुनील तटकरे यांची कृतज्ञता व्यक्त केली. या नर्सिंग कॉलेजला मान्यता मिळाल्यामुळे रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थ्यांची गैरसोय दूर होणार असून या चालू शैक्षणिक वर्षापासून बीएससी नर्सिंग कॉलेजला ६० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहेत अशी माहिती ॲड. राजीव साबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दरवर्षी या भागातील सुमारे १०० ते २०० विद्यार्थीनी मुंबई, अलिबाग, पूणे आणि अन्य जिल्ह्यांत नर्सिंग अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळविण्यासाठी धडपड करीत असतात. परंतु बर्याचशा विद्यार्थीनींना प्रवेश मिळत नाही. प्रवेश मिळाला तर राहण्याची व्यवस्था होत नाही. त्यामुळे अनेकांची इच्छा असूनही नाइलाजाने प्रवेश घेता येत नाही. हि असुविधा आणि गैरसोय लक्षात घेऊन खासदार सुनील तटकरे यांनी विशेष प्रयत्न करुन आरोग्य मंत्री हसन मुश्रीफ यांनी माणगाव येथील नर्सिंग कॉलेजला मान्यता मिळवून दिली.

विशेष म्हणजे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भारत सरकार आणि टाटा शिष्यवृत्तीची सोय करण्यात येणार आहे. पुढील काळात ए.एन.एम. दोन वर्षे, जे.एन.एम. तीन वर्षे हे पुरक परीचारीका कोर्स सुरू करण्यात येणार आहेत. बीएससी नर्सिंग कोर्स पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना महाराष्ट्र, देशात आणि परदेशात नोकरीची हमी आणि खात्री मिळत असते. विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके करण्यासाठी माणगाव मधील उपजिल्हा रुग्णालय, राऊत हॉस्पीटल, अल्फा हॉस्पीटल, पनवेल येथील रुग्णालय उपलब्ध होणार आहेत. भविष्यात माणगावात मेडिकल कॉलेज आणि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याचा मानस असल्याचेही संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेला संस्थेचे सेक्रेटरी कृष्णा गांधी, शाळा समिती चेअरमन नरेंद्र गायकवाड, श्रीमती विठाबाई गोगावले बीएससी नर्सिंग कॉलेजचे चेअरमन डॉ. गौतम राऊत, प्राचार्या महरोश सनगे, नितीन बामगुडे, उपस्थित होते.

**पान १ वरुन**

## रयत शिक्षण संस्थेच्या विविध समस्या सोडविण्यासाठी बैठक

आधुनिक काळातील शैक्षणिक बदलांशी जुळवून घेत सातत्याने गुणवत्ता आणि मूल्याधारित शिक्षण देण्याचे कार्य रयत शिक्षण संस्था करीत आहे. या पार्श्वभूमीवर संस्थेच्या कार्यात येणाऱ्या अडचणी आणि धोरणात्मक बाबींवर चर्चा करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक दृष्टिकोन दाखवत रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्यास शासन स्तरावरून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे सांगितले.

# टोळ खुर्द येथे सामाजिक सभागृहाचे लोकार्पण आणि बुद्धमूर्ती प्रतिस्थापना

**माणगाव : बातमीदार**

टोळखुर्द बौद्धजन सेवा संघावे विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ जयंती निमित्ताने दि. १३एप्रिल रोजी सामाजिक सभागृहाचे लोकार्पण माजी आमदार शामभाई सावंत यांचे हस्ते करण्यात आले. बुध्द मुर्तिची प्रतिस्थापना भदंत प्रज्ञावंत विन्यसन यांचे शुभहस्ते करण्यात आले.



यशपाल साळवी यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला स्वागताध्यक्ष नितीन साळवी , मूर्तिदाते उद्योजक नरेश रामा अहिरे, उपसभापती बो. प. स मुंबई विनोद मोरे, उप-कार्याध्यक्ष बौ.प.स.मुंबई चंद्रमणी तांबे, विकास गायकवाड रायगड गटप्रतिनिधी भूपेंद्र सवादकर, समाज सेवक विलास लोखंडे, टोळखुर्द सरपंच आरती सुतार, उद्योजक अभिजित कांबळे, रोहन साळवी, जेष्ठ समाजसेवक सदानंद येलवे, माणगांव गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, कुंदन हाटे, बळीराम मोरे, मुंबई विभाग अध्यक्ष संतोष साळवी,चंद्रमणी साळवी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले ते उद्योजक संजय मोरे, राजाराम काळू साळवी यांचे हस्त धम्माचे ध्वजारोहण करण्यात आले. संपूर्ण टोळ ग्रामस्थ यांनी सहभाग घेतला.

रात्री कव्वालीचा जंगी सामना आयोजित करण्यात आला होता. विजय खैरे आणि पार्टी कु. तेजल जाधव आणि पार्टी यांच्या बहुरंगी सामन्यांचा प्रेक्षकांनी आनंद घेतला. सर्व रसिकजन सकाळी ६ वा. पर्यंत हजर होते.

विशेष बाब दलित मित्र दादासाहेब मर्चडे, ड. बिपीन साळवी यांनी उपस्थिती दाखवली. माणगाव, महाड, म्हसळा,मंडणगड, मुंबई येथील लोक बहुसंख्येने उपस्थित होते.

# रानावनात झाडांना उन्हाळी रानफुलांचा बहर

**माणगाव: प्रतिनिधी**

एप्रिल, मे महिन्यात उन्हाचा पारा चढत असताना रानावनात मात्र उन्हाळी रानफुलांचा बहर आला आहे. चैत्र महिन्या रानावनात झाडांना पालवी फुटली असून या पालवीतच बहावा,निवडुंग ,गुलमोहर इत्यादी वृक्षांना मोठ्या प्रमाणात फुलांचा बहर आला आहे. रानावनात झाडांना पालवी बरोबरच आलेला हा बहर निसर्गप्रेमी ,पर्यटक यांच्या आकर्षणाचा विषय होत असून निसर्गातील उन्हाळ्याच्या काहिलीत बहरणारी रानफुले निसर्गाची शोभा वाढवित आहेत.

उन्हाळ्यात झाडांची पानगळ,उन्हाची वाढणारी काहीली व भकास वाटणारे रान असे काहीसे चित्र सर्वत्र दिसते.मात्र याच ऋतूत रानातील अनेक फळ झाडे ,फुल झाडे फुलून येतात यामुळें उन्हाळ्याच्या दिवसात रानाची शोभा वाढत असून रानावनात झाडांना उन्हाळी रानफुलांचा बहर आलेला दिसत आहे. कोकणातील सह्याद्री पर्वताची कडे कपारीत ,रस्त्यांच्या दुतर्फा ,शेत शिवारात असंख्य प्रकारच्या फळ ,फुल झाडांना पालवी बरोबरच फुलांचे गुच्छ आले आहेत.एरवी उन्हाळा रुक्ष उदास वाटतो मात्र रानावनात फुलणाऱ्या उन्हाळी रान फुलांनी निसर्ग उन्हाळ्यातही आपली शोभा कायम ठेऊन सुंदरता कायम ठेवत असल्याचे निसर्गप्रेमी ,पर्यटक समाधान व्यक्त करीत आहेत.



**उन्हाळा वाढत असताना रानावनात असंख्य प्रकारच्या झाडा, वेलीना फुलांचा बहर आला आहे.हा बहर रानावणाची शोभा वाढत आहे. रानात बहरलेली ही फुले पाहणे अतिशय आनंदाचे आहे .ही फुले ऐन उन्हाळ्यात फुलतात. या नंतर काही दिवसांनी पावसाळा सुरू होईल.पावसाळा जवळ आल्याचे उन्हाळी रान फुले संकेत देतात**

**-विलास देगावकर,**
**फुल निरीक्षक, माणगाव**

# पनवेल महापालिका मालमत्तांवर करणार सौर ऊर्जेची निर्मिती

## एक हजार किलो वॅट वीज निर्मितीचे लक्ष्य



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेने एक हजार किलो वॅट सौर ऊर्जेची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट आखले आहे. अनेक महिन्यांपासून पालिकेतील विविध मालमत्तांवर सौर यंत्रणा बसवण्याचे काम सुरू आहे. यासाठी स्वनिधी आणि जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून तब्बल १० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. वीज निर्मितीसाठी विविध ठिकाणी पालिकेने कामे हाती घेतली आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी प्रत्येक महापालिकांना जास्तीत जास्त सौर ऊर्जेची निर्मिती केंद्र बनण्याचे लक्ष्य दिले आहे. यामुळे मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी सुद्धा अनेक महिन्यांपासून महापालिकेच्या प्रत्येक मालमत्तांवर अपारंपरिक ऊर्जा निर्मितीची यंत्रणा बसविण्याचे आदेश पालिकेच्या वीज विभागाला दिले. सौर ऊर्जेचा सर्वाधिक वापर ज्याठिकाणी वीज जोडणीची समस्या किंवा वारंवार वीज पुरवठा खंडित होतो अशा ठिकाणी करावा असे आदेश आयुक्त चितळे यांनी दिले होते.

पालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर आणि वीज विभागाचे प्रमुख प्रीतम पाटील यांनी सौर ऊर्जा यंत्रणा बसविण्यासाठी अशा ठिकाणांची निवड केली. यामध्ये पनवेल महापालिका क्षेत्रातील ६० सार्वजनिक शौचालयांची निवड करण्यात आली. यातील अनेक शौचालये शीव-पनवेल महामार्गावर आहेत. तसेच ३७ विविध बसथांबे निवडण्यात आले. अनेकदा महामार्गांवरील बसथांब्यापर्यंत वीज पुरवठा करणे शक्य होत नसल्याने सौर ऊर्जा हा उत्तम पर्याय प्रवाशांना मिळणार आहे. तब्बल ९७ ठिकाणी बसविण्यात येणाऱ्या सौर ऊर्जा यंत्रातून २ किलो वॅट वीज निर्माण होईल.

महापालिका लवकरच खारघर येथील स्काय वॉकवर सौर ऊर्जेचे यंत्रणा बसविणार आहे. यासाठी ७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यामधून ६०० किलो वॅटची उर्जा निर्माण होईल. जिल्हा नियोजन समितीच्या मंजूरीनंतर हे काम हाती घेतले जाईल तसेच महापालिकेच्या १० वेगवेगळ्या मालमत्तांवर पालिका सौर ऊर्जा यंत्र बसविण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, पनवेल शहरातील अग्निशमन दलाची इमारत, पनवेल शहरातील प्रभाग समिती (ड) कार्यालय, खारघर येथील आयुक्त निवासस्थान, पनवेल शहरातील उर्दू विद्यालय, कळंबोली येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, कळंबोली येथील प्रभाग समिती कार्यालय, पनवेल शहरातील गावदेवीपाडा येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, कोळीवाडा येथील आरटीपीसीआर प्रयोगशाळा, कामोठे येथील प्रभाग समिती कार्यालय अशा १० ठिकाणी बसवलेल्या सौर उर्जा यंत्रातून ३५२ किलो वॅटची ऊर्जा निर्मिती केली जाणार आहे.

> **राज्य शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे पनवेल महापालिकेने सौर ऊर्जा निर्मितीवर पालिकेच्या मालमत्ता असाव्यात यासाठी हे नियोजन केले आहे. यामधून अपारंपरिक ऊर्जा निर्मिती होईल तसेच पालिकेचा वीज देयकावरील खर्च कमी होईल. ज्या ठिकाणी महावितरण कंपनीकडून वीज पुरवठा करणे शक्य होत नाही अशा ठिकाणी सौर ऊर्जा हा चांगला पर्याय नागरिकांसाठी उपलब्ध राहील.**
>
> **-कैलास गावडे, उपायुक्त, पनवेल महापालिका**

## निवडक

### दोन दुचाकींचा अपघात; तिघे जखमी

**पनवेल** : दोन मोटारसायकलच्या अपघातात तीन जण जखमी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील माथेरान-पनवेल रोडवर वेदांत पब्लिक स्कूल नेरे येथे घडली आहे. जयदीप सुर्यवंशी (२७) हा त्याचा मित्र आकाश वाकोडे असे मोटार सायकलवरुन टेमघर येथून नेरेकडे माथेरान-पनवेल रोडने येत असताना वेदांत पब्लिक स्कूल येथे पनवेल बाजूकडून येणार्या मोटार सायकलवरील चालकाने चुकीच्या बाजूने चालवून त्यांच्या मोटार सायकलला ठोकर मारल्याने झालेल्या अपघातात जयदीप सुर्यवंशी, आकाश वाकोडे याच्यासह अपघात करणारा मोटारसायकलस्वार हे तीघे जण जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### गुन्ह्यातील जप्त वाहनांचा जाहीर लिलाव

**पनवेल** : कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत वेगवेगळ्या गुन्ह्यात जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव कामोठे पोलीस करीत आहेत. यामध्ये अल्टो कार क्र.एमएच-०३-के-५५९८, स्वीफ्ट कार क्र.एमएच-४३-आर-५२७३, रिक्षा क्रं.एमएच-४६-एसी-३९४६, मोटार सायकल क्र.एमएच-०४-ईएम-०८३७, होंडा सिटी गाडी क्रं.एमएच-०६-एम-३२१६, इंडिका गाडी क्रं.एमएच-०९-सीए-१०२३ व अॅक्टीव्हा स्कुटी क्रं.एमएच-४६-बीडल्यू-८०९६ यांचा लिलाव २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता तळोजा पोलीस ठाण्याच्या शेजारी ईएमएसी सेंटर येथे होणार आहे. तरी दिवशी परवानाधारक यांनी या लिलावात भाग घ्यावा, असे आवाहन वपोनि विमल बिडवे यांनी केले आहे.

### महिलेचा मृतदेह सापडला

**पनवेल :** नवीन पनवेल येथील आदई तलावात अंदाजे साठ वर्षीय महिलेचा मृतदेह सापडून आलेला आहे. या महिलेची ओळख पटली नसल्याने खांदेश्वर पोलीस तिची ओळख पटवत आहेत. ही मृत महिला निम गोरी, केस लांब पांढरे, अंगावर चॉकलेटी रंगाची पांढरे लहान चेक्स असलेली साडी, पोपटी रंगाचा ब्लाउज परिधान केलेला आहे. गळ्यात तुळशीची माळ असून काळी मण्याचे लहान डोरले, कानात फुले, नाकात मुगवट आहे. तिच्या दोन्ही हातावर फुलाची डिझाईन असलेले मोठे गोंदण आहे. या मृत महिलेच्या नातेवाईकाचा शोध घेऊन मिळून आल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणेस कळवावे असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक संजय परशकर (मोबाईल-९९२३७०९५९९) यांनी केले आहे.

### ड्रंक अँड ड्राईव्हमध्ये चालकाचा मृत्यू

**पनवेल :** खारघर सेक्टर ३४ मध्ये ड्रंक अँड ड्राईव्ह करून एटिंगा वाहनाला धडक देणार्या ४२ वर्षीय सुजित अनिल दास या मद्यपी बसचालकाचा अकस्मात मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. प्रणाम हॉटेलसमोर झालेल्या अपघातात गाला ट्रान्सपोर्ट कंपनीची बस अंधेरी एमआयडीसीतून घेऊन येत असताना मद्यधुंद अवस्थेत असणार्या सुजित याने एका कारला धडक दिली होती.

## दुचाकी, चारचाकी वाहनांना आकर्षक पसंतीच्या क्रमांकासाठी आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे.

यासाठी ज्यांना दुचाकी व चारचाकी वाहनांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क भरुन हवे असतील त्यांनी २२ एप्रिल रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते दुपारी २.३० या दरम्यान विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या खाजगी वाहन विभागात डीडी, निवासी पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल यांनी केले आहे.

एकाच नंबरकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी २२ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. त्यानुसार एकाच नंबरसाठी एकापेक्षा जास्त अर्ज असतील तर त्या अर्जदारांनी त्याची नोंद घेऊन २३ एप्रिल रोजी दुपारी २.३० वाजेपूर्वी त्यांच्या इच्छे प्रमाणे जास्तीच्या रक्कमेचा डीडी बंद लिफाफ्यामध्ये कार्यालयात जमा करावा.अतिरीक्त धनाकर्षण कमीत कमी ३०९ रु.चा असावा. सदर अर्जासाठी त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नवीन वाहन नोंदणी विभाग यांच्या दालनात लिलाव करण्यात येईल.

## गव्हाण विद्यालयात चावडी वाचन

### ◆ निपुण महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या निपुण महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनियर कॉलेजमध्ये इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी ' चावडी वाचन ' कार्यक्रम ( १७ एप्रिल ) संपन्न झाला.



विद्यार्थ्याने प्राथमिक स्तरावर किमान त्याच्या भाषा वाचन व गणनक्षमता विकसित झाल्या आहेत किंवा नाही, गुणवत्ता पूर्ण कौशल्य प्राप्त केले आहे किंवा कसे याची खातरजमा करून घेण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना किमान लिहिता-वाचता येते की नाही,मूलभूत साक्षरता व संख्यात्मकता तपासून त्याची स्तर निश्चिती करण्यासाठी चावडी वाचन उपक्रम हाती घेण्यात आला. निपुण महाराष्ट्र सन २०२४-२५ कार्यक्रमांतर्गत चावडी वाचन हा उपक्रम विद्यालयात इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी संपन्न झाला. शिक्षणाचा दर्जा सुधारणे ह्या चावडीवाचन हा उपक्रम राबवण्याच्या मुख्य हेतूप्रमाणे गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांच्या वाचनाची गुणवत्ता तपासणे व या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या वाचनाचा स्तर निश्चित करून त्यानुसार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे ठरविण्यात आले.या उपक्रमात पालकांनी लक्षणीय उपस्थिती दर्शवून उत्स्फूर्त सहभाग घेतला. पालकांनी आपली मते व्यक्त केल्यानंतर या मतांवर शिक्षक पालक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये साधक-बाधक चर्चा झाली. विद्यार्थ्यांनी पुस्तके,वर्तमानपत्रे,शब्द पट्ट्या यांचे वाचन केले.

विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमास उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे ,पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर,जेष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे,ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील,इयत्ता पाचवीच्या वर्गशिक्षिका उज्वला म्हात्रे,अस्मिता वर्तक व शाळेतील सर्व उपशिक्षक व इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांचा पालकवर्ग आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन द्रौपदी वर्तक यांनी केले तर संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांनी आभार मानले.

## पनवेल मनपाकडून धूळ प्रदूषण नियंत्रणासाठी यंत्रणेचा वापर

### दैनंदिन हवा प्रदूषण गुणवत्ता पातळी तपासणार

**पनवेल: रामप्रहर वृत्त**



वाढत्या धुळी प्रदूषणावर नियंत्रण करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाने विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार महापालिका कार्यक्षेत्रातील धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी अत्याधुनिक साधनसामग्रीचा वापराबरोबरच जनजागृती अभियानांचा समावेश आहे.

महानगरपालिकेने पालिका कार्यक्षेत्रात ४ फॉग कॅनन वाहने (सूक्ष्म धूळ नियंत्रण करणारी यंत्रे) कार्यरत केली असून, या वाहनांद्वारे चारही प्रभागामध्ये दररोज धूळ प्रदूषण नियंत्रणाच्या दृष्टीने सूक्ष्मरित्या पाण्याची फवारणी करण्यात येत आहे. याबरोबरच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील हवेतील प्रदूषणाची गुणवत्ता निरीक्षण करणेसाठी मोबाईल एअर क्वालिटी मॉनिटरींग व्हॅन कार्यरत आहे. या गाडीच्यामार्फत पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये दैनंदिन हवा प्रदूषण गुणवत्ता पातळी तपासली जात आहे.

मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशानुसार पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बेकरी युनिट्सना लाकूड व कोळशाचा वापर थांबवण्याचे आणि या युनिट्स सीएनजी गॅस किंवा विद्युत तंदूर वापरण्यासाठी रुपांतरीत करण्याबाबत आतापर्यंत १५१ नोटीस जारी करण्यात आल्या आहेत. तसेच मा. उच्च न्यायालय मुंबईच्या आदेशानुसार दिनांक २८ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रभाग अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रभाग स्तरीय हवा प्रदूषण नियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रभाग अधिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली प्रभाग स्तरीय हवा प्रदूषण नियंत्रणासाठी भरारी पथके गठित करण्यात आली आहेत.

याबरोबर संपूर्ण पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात धूळ प्रदूषणाविषयी जनजागृती करण्यासाठी आणि विविध मोहिमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने माहिती , शिक्षण, आणि संवाद वाहन सुरू करण्यात आले आहे. या वाहनामार्फत पर्यावरण विषयक माहिती , माझी वसुधंरा अभियान, प्लॉस्टिक बंदी जनजागृती , प्रदूषण नियंत्रण विषयक विविध मोहिमा , पर्यावरण पूरक सण-उत्सव शासनाचे पर्यावरण विषयक विविध उपक्रम याबाबतची माहिती प्रसारित करून नागरिकांमध्ये जनजागृती केली जाते आहे.

तसेच पनवेल महानगरपालिकेकडून जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या १६४ बांधकाम विकासक, व्यावसायिकांना नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी धूळ प्रतिबंधासाठी हिरवे पडदे ( ग्रीन नेट)धातूचे पत्रे लावण्यासंबंधी मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

### धूळ प्रदूषण नियंत्रणाकरिता प्रस्तावित करण्यात आलेल्या उपाययोजना

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग क्षेत्रामध्ये हवेची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून हवा शुद्धीकरण करणेसाठी हवा शुद्धीकरण यंत्र स्थापन करण्यासाठी निविदा क्रिया सुरू आहे. यामध्ये खारघर, तळोजा, कळंबोली, कामोठे ,पनवेल मधील विविध १० ठिकाणी ही हवा शुद्धीकरण यंत्रे बसविण्यात येते. पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हवा गुणवत्ता निर्देशांक तसेच हवामान घटकांचे जसे की वाऱ्याचा वेग, वाऱ्याची दिशा, तापमान व पर्जन्यमान इत्यादी घटकांचे निरिक्षण करणे व हवेच्या गुणवत्तेबद्दल नागरिकांना अचूक माहिती देण्यासाठी ७ ठिकाणी रिअल टाईम एम्बीएंट एअर क्वालिटी मॉनिटर अ‍ॅण्ड डिस्प्ले बोर्ड थापन करणेसाठीची निविदा प्रक्रिया सुरू आहे.**

## कालिवली येथे मूर्तींचा प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

**मोहोपाडा :** रसायनी पाताळगंगा अतिरिक्त हद्दीतील कालिवली ग्रामस्थांच्यावतीने मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यावेळी कळसपुजन, ध्वजपुजन, विणापुजन, मृदुंगपुजन,तुळसपुजन,ग्रंथपुजन ग्रामस्थ मंडळ व महीला मंडळ यांच्याहस्ते करण्यात आले.

यानिमित्ताने श्री गणेश,श्रीराम,सितामाई,लक्ष्मण, व श्री हनुमान मुर्ती मिरवणुक कालिवली गावातून काढण्यात आली.यावेळी पाच दिवस हरिपाठ व किर्तनकारांचे किर्तंन पार पडले.मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा अखंड हरिनामाच्या जयघोषात पार पडला.परिसरातील भाविकांच्या उपस्थितीत विठ्ठल नामाच्या गजरात व श्रीरामाच्या जयजयकारात सोहळा झाला.या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा समस्त ग्रामस्थ व कचरे कुटूंब कालिवली यांच्या वतीने करण्यात आली.

## वडाळे तलावात पसरली जलपर्णी आणि शेवाळ

**पनवेल : वार्ताहर**


पनवेल परिसरातील सुप्रसिद्ध वडाळे तलावाच्या काही भागात सध्या शेवाळ तसेच जलपर्णी पसरली आहे. या तलावातील जलपर्णी तसेच शेवाळ काढून हा तलाव व स्वच्छ करावा, अशी मागणी पर्यावरणप्रेमी करीत आहेत.

सध्या वडाळे तलावातील काही भागात पाणी अदृश्य झाले असून जलपर्णी तसेच शेवाळ दिसून येत आहे. या तलावाची अशी अवस्था पाहून येथे विरंगुळ्यासाठी येणारे नागरिक नाराजी व्यक्त करू लागले आहेत.

पनवेलच्या विकासातील महत्त्वाची ओळख म्हणून वडाळे तलावाकडे पाहिले जाते, मात्र सध्या संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे हा तलाव समस्यांच्या गर्तेत अडकत चालला असल्याचा आरोप येथील नागरिक करीत असून या तलावातील जलपर्णी तसेच शेवाळ तत्काळ काढून हा तलाव स्वच्छ व सुशोभित करावा, अशी मागणी येथील पर्यावरणप्रेमी करू लागले आहेत. दरम्यान, या संदर्भात महापालिकेने दखल घेत उपाययोजना करणार असल्याचे म्हटले आहे.

> **वडाळे तलावातील शेवाळ, जलपर्णी तसेच उगवत असलेली रोपे काढून तलाव सुशोभित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. या तलावातील जलपर्णीची वाढ झपाट्याने होते. त्यामुळे जलपर्णीची ही वाढ रोखण्याकरिता तज्ज्ञांचा सल्ला घेऊन योग्य ती उपाययोजना केली जाईल.**
>
> **-संजय कटेकर, कार्यकारी अभियंता, पनवेल महापालिका**

## सुकापूरमध्ये डॉ. आंबेडकर जयंती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुकापूर साक्षी पार्क १मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी झाली.

ध्वजवंदन व बुध्दवंदना बौध्दाचार्य चंद्रकांत सावंत यांच्या हस्ते झाली. सभासद व विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ झाला. मुलांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. महिलांचे सांस्कृतिक कार्यक्रम रंगले. प्रा. विजय मोहिते यांचे भगवान बुध्दांचा धम्म काल, आज आणि उद्या या विषयावरील व्याख्यान, त्यानंतर रात्री शाहीर अभिषेक पाटील यांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर झाला.

कार्यक्रम यादव शेळके यांच्या अध्यक्षतेखाली झाला. समितीचे कार्याध्यक्ष अॅड. मधुकर बोराळे, सचिन माटवणकर, बाबासाहेब तोरणे, सुबोध पवार, पंकज डोळस, संदीप गायकवाड, सागर उबाळे, आकाश पवार, निखिल गमरे, स्वप्निल दुपटे, विजय सातपुते, महेंद्र जाधव तसेच महिला मंडळाच्या अध्यक्ष वंदना हिवाळे, शिल्पा गमरे, सुनिता डोळस, अनिता कांबळे, शिल्पा सातपुते, स्वाती उबाळे, वैशाली माटवणकर, ज्योती गायकवाड, नंदा तोरणे, सुनील दुपटे, जयद्रथ हिवाळे, सत्तापा कांबळे, देवेद्र मोरे, महेंद्र भोसले, नंदा पवार, निर्मला पवार, विमल डोळस, जयश्री माटवणकर, अरविंद डोळस, महेंद्र ननावरे, अशोक कांबळे, मैथिली जाधव, शारदा शेळके, रमेश पगारे, हेमराज रामटेके, शिवराम कदम, निलेश कदम यांनी मेहनत घेतली.

## उरण ते शेगाव एसटी बससेवा सुरू



**उरण : वार्ताहर**

उरण शेगांव या प्रवासी मार्गावर उरण आगारातून नविन बससेवेचा मंगळवार (दि. १५) रोजी शुभारंभ करण्यात आला. उरण एस टी डेपोतून शेगाव पर्यंत बस सेवा सुरु करण्यात आली आहे .हि सेवा नियमित स्वरुपात सुरु राहणार राहणार असून याचा लाभ प्रवाशांनी घ्यावा असे आवाहन एस टी प्रशासनाने केले आहे .

बस दररोज सकाळी ७.१५ वाजता उरण बस डेपोतून सुटेल. पुढे पनवेल , कल्याण .,नाशिक ,मालेगाव ,धुळे,जळगाव ,भुसावळ,मलकापूर ,खामगाव मार्गे शेगाव येथे मध्यरात्री १.३० वाजता पोहचेल त्याच वेळेस देखील परतीची बस निघणार आहे .तिकीट दर प्रौढ प्रवासी १०६१ ,बालक ५३४,व ७५ वर्षावरील जेष्ठ नागरिकांसाठी मोफत प्रवास ,महिलांसाठी ५० टक्के तिकिट सवलत ,आरक्षण ओंन लाईन उपलब्ध आहे.

उरण ते शेगाव हे सुमारे ६५० किलो मीटर चे अंतर असून अंदाजे १८ तासांचा प्रवास अपेक्षित आहे .

आई सप्तशृंगी खानदेश मंडळात अध्यक्ष प्रकाश चित्ते यांनी पुष्पहार व चालक,वाहक यांना पुष्प देऊन व उपाध्यक्ष कैलास पाटील व खजिनदार वामनराव राठोड श्रीफळ अर्पण करून,या नवीन सेवेचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी आगार कर्मचारी वर्ग व प्रवासी वर्ग उपस्थित होते.

## संपादकीय

# शेतकऱ्यांसाठी आनंदवार्ता

देशात यंदा सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. निश्चितपणे शेतकऱ्यांसाठी ही सुखावणारी बातमी आहे. निसर्ग बदलतो आहे हे एव्हाना चांगलेच स्पष्ट झाले आहे. बदलत्या अनियमित हवामानात अशा अंदाजांतूनच शेतकऱ्यांना काही प्रमाणात शेतीचे नियोजन शक्य होत असते.

**निसर्गाला समजून घेतच मानव उत्क्रांत होत आला आहे. तरीही अलीकडच्या काळातील मानवी जगण्यातून होणारी निसर्गाची हानी काही आपण फारशी रोखू शकलेलो नाही. हवामान बदलांची जाणीव आता तीव्र झाली असली तरी अद्यापही त्या दिशेने फार काही बदलताना दिसत नाही. निसर्ग बदलतो आहे. भारतासारख्या देशात पर्जन्यमान अधिकाधिक अनियमित होत चालले आहे. दोन महिन्यांत पडावयाचा पाऊस अकस्मात दोन-चार दिवसांत पडून जातो आहे. यामुळे शहरी भागांमध्ये पूरस्थिती उद्‌भवून वाहतुकीची कोंडी होणे, जनजीवन ठप्प होणे यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते, परंतु निसर्गाच्या या लहरी वर्तनाचा कितीतरी अधिक फटका शेतकऱ्यांना बसतो. त्यांनी शेतीविषयी, पिकाविषयी बांधलेले आडाखे पार कोलमडून जातात. हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला जातो. आणि शेतकऱ्यांसमोर हतबलतेने आल्या संकटाला तोंड देण्याखेरीज दुसरा उपाय उरत नाही. अशा वेळी हवामानाचे, पावसाचे अधिकाधिक अचूक अंदाज वेळेत शेतकऱ्यांपर्यंत पोहचणे खूपच गरजेचे आहे हे स्पष्ट होत चालले आहे. आजही आपला देश एक कृषीप्रधान अर्थव्यवस्थाच आहे. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवरही शेतीचे नुकसान मोठा परिणाम करत असते. पाऊस चांगला झाला तर अन्नधान्याचे उत्पादन अधिक होते. टंचाई निर्माण झाली नाही की दर आटोक्यात राहतात. सर्वसामान्य ग्राहकांसाठीही त्यामुळे चांगल्या पावसाची बातमी ही शुभवार्ताच असते. कृषी उत्पादनांवर अवलंबून असलेले अन्य उद्योगही या वार्तेने सुखावतात. आजही आपल्या देशातील बहुसंख्य शेतकरी हे अल्प भूधारक आहेत. ते सिंचनावर आधारित शेतीऐवजी पावसावरच बहुतांशी अवलंबून असतात. त्यामुळे गावखेड्यातील या तमाम शेतकऱ्यांच्या मनात पावसापूर्वी हा एकच प्रश्न असतो की यावर्षी पाऊस किती होणार? वाढत चाललेले तापमान आणि पावसाची अनियमितता यामुळे पिकांवर व शेतीतून मिळणाऱ्या उत्पादनांवर मोठा परिणाम होताना दिसतो आहे. या अनियमिततेशी शेतकऱ्यांनी जुळवून घेण्याची गरज आहे आणि त्यामुळेच हवामानाच्या अचूक अंदाजाचे महत्त्व वाढले आहे. पाऊस किती आणि कसा होणार हे कळल्यानंतर शेतकरी पिकाचे तसेच खते आणि इतर गोष्टींसाठीच्या गुंतवणुकीचे नियोजन करू शकतात. यंदा पाऊस सुरू होण्यास जवळपास दोन महिन्यांचा अवकाश असतानाच सरासरीच्या १०६ टक्के पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. देशातील यंदाच्या पावसाविषयीचा हवामान विभागाचा हा पहिला व दीर्घकालीन अंदाज असून महाराष्ट्रातदेखील यंदा मान्सून चांगला राहील असे भाकीत वर्तवण्यात आले आहे. ८ जूनपर्यंत मान्सून येण्याची शक्यता आहे. पुढचा सुधारित पावसाचा अंदाज हा मे महिन्याच्या शेवटी वर्तवण्यात येणार आहे. त्यानंतर मान्सूनसंदर्भातील चित्र आणखी स्पष्ट होईल. अलीकडे काही खाजगी संस्थाही पावसाचा अंदाज जाहीर करतात. यंदा या खासगी संस्था व हवामान विभाग यांच्या अंदाजात फार तफावत दिसत नाही. गेल्या वर्षी एल निनो सक्रिय नव्हता. तेव्हा सरासरीच्या १०८ टक्के पाऊस झाला. यंदाही हा घटक सक्रिय नसल्याने चांगल्या पावसाची अपेक्षा आहे.**

# नेते शेकाप का सोडताहेत?

**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर

अखेर जे होणार होते ते झाले. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे बंधू माजी आमदार पंडित पाटील, शेकापचे माजी जिल्हा सरचिटणीस ॲड. आस्वाद पाटील यांच्यासह पक्षाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी बुधवारी भाजपमध्ये प्रवेश केला. शेकापला घरातच धक्का बसला आहे. यातून पक्ष सावरणे कठीण आहे.

यापूर्वी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी शेकाप सोडला होता. त्यामुळे पनवेल, उरण, पेण या तालुक्यांमधील शेकाप क्षीण झाला. शेकापची ताकद अलिबाग तालुक्यात उरली होती, मात्र आता शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या घरातच फूट पडली आहे. अलिबागधील शेकापला भगदाड पडले आहे. आगामी जिल्हा परिषद तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत याचे परिणाम शेकापला भोगावे लागणार आहे. पंडित पाटील आणि ॲड. आस्वाद पाटील यांच्यामुळे अलिबाग तालुक्यात भाजपची ताकद वाढली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपला त्याचा फायदा होणार आहे. नेते शेकापला सोडून जात आहेत. त्यामुळे शेकापची या जिल्ह्यातील ताकद कमी होत आहे. हे का घडले याचा विचार शेकापच्या नेत्यांनी केला पाहिजे.

माजी आमदार पंडित पाटील हे शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांचे धाकटे बंधू आहेत, तर ॲड. आस्वाद पाटील हे शेकापच्या माजी मंत्री स्व. मीनाक्षीताई पाटील यांचे पुत्र आहेत. पंडित पाटील हे एक वेळ आमदार होते. त्यांनी रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्षपददेखील भूषविले आहे. ॲड. आस्वाद पाटील यांनी शेकापचे जिल्हा चिटणीसपद त्यांनी प्रदीर्घकाळ संभाळले आहे. अलिबाग पंचायत समितीचे सभापतीपद, त्यानंतर जिल्हा परिषदेचे गटनेते, अर्थ व बांधकाम सभापती, राजिप उपाध्यक्षपद तसेस प्रभारी अध्यक्षपद म्हणून काम पाहिले आहे. त्यामुळे या दोघांचा जिल्ह्यात चांगला जनसंपर्क आहे. दोघांनाही जिल्ह्याच्या राजकारणाची जाण आहे. जिल्हा परिषदेच्या प्रशासनावर त्यांची आजही पकड आहे. त्यामुळे भाजपासाठी या दोघांचा पक्षप्रवेश महत्त्वाचा ठरणार आहे.

२०२४च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाने तिकीट नाकारल्याने पंडित पाटील व ॲड. आस्वाद पाटील नाराज होते. अलिबाग विधानसभा मतदारसंघातून त्यांना निवडणूक लढवण्याची इच्छा होती, मात्र शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी दोघांना उमेदवारी नाकारली, त्याऐवजी सून चित्रलेखा पाटील यांना उमेदवारी दिली. यामुळे पाटील कुटुंबात वादाची ठिणगी पडली. जयंत पाटील यांच्या या निर्णयामुळे नाराज असलेले पंडित पाटील आणि ॲड. आस्वाद पाटील विधानसभा निवडणुकीतील प्रचारापासून दूर राहिले. त्याचा परिणाम निवडणूक निकालावर झाला. शिवसेनेचे महेंद्र दळवी हे चित्रलेखा पाटील यांचा पराभव करत पुन्हा आमदार झाले. अलिबाग मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा बिगर शेकाप आमदार निवडून येण्याची ही पन्नास वर्षातील पहिलीच वेळ होती.

विधानसभा निवडणुकीनंतर ॲड. आस्वाद पाटील यांनी पक्षातील पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यानंतर जिल्हा चिटणीसपद आणि पक्ष सदस्यत्वाचा राजिनामा देत असल्याचे जाहीर केले. तेव्हापासून ते भाजपच्या वाटेवर असल्याच्या चर्चा सुरू होत्या. काही कारणांमुळे पक्षप्रवेश पुढे जात होता. आस्वाद पाटील यांचा भाजप प्रवेश होत नसल्याने त्यांच्या सहकाऱ्यांमध्येही अस्वस्थता निर्माण झाली होती. पंडित पाटील यांच्याबाबत अनिश्चितता होती, परंतु १६ एप्रिल रोजी पंडित पाटील यांनीदेखील भाजपमध्ये प्रवेश केला.


आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ॲड. आस्वाद पाटील व माजी आमदार पंडित पाटील यांचा पक्षप्रवेश भाजपसाठी महत्त्वाचा आहे. पनवेल, उरण, अलिबाग आणि पेणमधील शेकापचे काही नेते आणि कार्यकर्ते पंडित पाटील व ॲड. आस्वाद पाटील यांच्या संपर्कात आहेत. मुंबईत झालेल्या कर्याक्रमात कही मोजक्याच लोकांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. लवकरच रायगड जिल्ह्यात मेळावा घेऊन त्यात काही अन्य नेत्यांचा भाजपत प्रवेश होणार आहे. त्यामुळे त्यामुळे शेकापची ताकद कमी होईल. याचा फटका आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शेकापला बसेल.

नेते सोडून गेल्यामुळे पक्ष संपत नाही हे सत्य आहे, पण पक्षाची ताकद कमी होते हेदेखील नाकारता येणार नाही. मागील काही वर्षात अनेक नेते सोडून गेल्यामुळे शेकापची ताकद कमी झाली ही वस्तुस्थिती आहे. कुणी पक्ष सोडून गेला म्हणून पक्ष संपणार नाही असे बोलणे सोप आहे, पण नेते पक्ष सोडून का जात आहेत याचा विचारदेखील शेकाप नेतृत्वाने केला पाहिजे. खासदार धैर्यशील पाटील यांनी पक्ष सोडला. त्याचा परिणाम काय झाला हे लोकसभा व विधानसभा निवडणुकीत दिसला. पंडित पाटील व ॲड. आस्वाद पाटील यांनी शेकाप सोडल्यामुळे पक्ष संपणार नाही, मात्र अलिबाग विधानसभा मतदारसंघात याचे परिणाम शेकापला भोगावे लागतील हे नक्की!

# समाजसुधारक महर्षी धोंडो केशव कर्वे

समाजसुधारक महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यामध्ये शेरावली या गावी झाला. यांच्या वडिलांचे नाव केशव बापूराव कर्वे आणि आईचे नाव लक्ष्मीबाई कर्वे होते. त्यांचे बालपण मुरूड या रत्नागिरी जिल्ह्यातील एका गावात गेले.

महर्षींनी महिलांचे शिक्षण, त्यांचे हक्क, विधवा-पुनर्विवाह यांसाठी आपले १०४ वर्षांचे जीवन वाहिले. शिक्षणासाठी त्यांना फार परिश्रम घ्यावे लागले, दुरवर पायपीट करावी लागायची. ते मॅट्रिक झाल्यानंतर मुंबई येथील एल्फिन्स्टन कॉलेजात गणिताची पदवी घेण्याकरता त्यांनी प्रवेश मिळवला. कर्वेंनी त्या वर्षी फर्ग्युसन कॉलेज येथे गणित हा विषय शिकविण्यास सुरूवात केली. १९१४पर्यंत त्यांचं हे कार्य सुरू होतं.



कर्वे १४ वर्षांचे असताना त्यांचा विवाह आठ वर्षांच्या राधाबाईंशी झाला. वयाच्या २७व्या वर्षी बाळांतपणात राधाबाईंचा मृत्यू झाला. राधाबाईंच्या मृत्यूनंतर कर्वेंना पुनर्विवाह करण्यासाठी आग्रह धरला गेला. त्या वेळी त्यांचे वय ४५ होते. त्या काळी प्रौढ विधुरांचा विवाह लहान वयाच्या कुमारीकेशी लावून देण्याची प्रथा होती, परंतु जर मुलीच्या पतीचे लवकर निधन झाले तर तिला मात्र तिचं आयुष्य विधवा म्हणुन व्यतीत करावे लागे. महर्षी कर्वेंना ही बाब अजिबात मान्य नव्हती म्हणून त्यांनी पंडिता रमाबाईंच्या शारदा सदन येथे वास्तव्यास असलेल्या गोदुबाई या विधवेशी पुर्नविवाह केला. समाजाला ही गोष्ट अजिबात रूचली नाही.त्यांचा सामाजिक बहिष्कार करण्यात आला. या गोष्टींचादेखील त्यांनी खूप धिटाईने सामना केला. गोदुबाई पुढे आनंदी कर्वे व बाया कर्वे या नावाने प्रसिध्द झाल्या.त्यांनी महर्षी कर्वे यांना खूप साथ दिली.त्या खंबीरपणे त्यांच्या बरोबरीने उभ्या राहिल्या.

कर्वेंनी पुनर्विवाहविधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळाची स्थापना केली. बालविवाहासारख्या कुप्रथा बंद व्हाव्यात म्हणून त्यांनी अनाथ बालिकाश्रमाची स्थापना केली. विधवांकरता वसतिगृहाची त्यांनी निर्मीती केली. विधवा महिलांसाठी महिला विद्यालयाची स्थापना केली. या विद्यालयात महर्षी कर्वेंची २० वर्ष वयाची विधवा मेहुणी पार्वतीबाई आठवले पहिली विद्यार्थिनी म्हणून होती. महर्षींनी आश्रमाच्या शाळेच्या कार्यासाठी मनुष्यबळ पाहिजे होते, त्यासाठी त्यांनी निष्काम कर्ममठांची स्थापना केली.पुढे त्याचे नाव हिंगणे स्त्री शिक्षण संस्था नंतर महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था असे करण्यात आले. अस्पृश्यता, जातीभेद, जातीव्यवस्था या विरोधातदेखील त्यांनी आवाज उठवला.९ नोव्हेंबर १९६२ रोजी त्यांचे पुण्यात निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# ना कार्ड, ना पिन, ना फोन... फक्त हात स्कॅन करून पेमेंट

भारतात लोक अगदी छोटं पेमेंट करण्यासाठीदेखील UPI (युनिफाइड पेमेंट इंटरफेस) वापरतात.



डिजिटल पेमेंटचा ट्रेंड इतका वाढला आहे की, आजकाल लोक कॅशलेस होऊन सर्व ठिकाणी फिरतात. पण आता चीनने या बाबतीत एक पाऊल पुढे टाकलं आहे आणि असं अफलातून तंत्रज्ञान आणलं आहे ज्याने संपूर्ण जगाला आश्चर्यचकित केलं.

तंत्रज्ञानाच्या जगात चीन सतत नवनवीन कामगिरी करत आहे. आता चीनच्या नव्या तंत्रज्ञानाने इंटरनेटवर खळबळ उडाली आहे. आता लोक कार्ड किंवा मोबाईल वापरत नाहीत तर फक्त त्यांचा हात स्कॅन करून पेमेंट करतात.

आजकाल, 'वीचॅट पाम पे' नावाच्या चिनी तंत्रज्ञानाचा एक व्हिडीओ इंटरनेटवर व्हायरल होत आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने लोक फक्त त्यांचा हात स्कॅन करून पेमेंट करू शकतात.

सोशल मीडियावर तुफान व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये, एक माणूस चीनमधील ७-इलेव्हन स्टोअरमधून पाण्याची बाटली खरेदी करत होता. तो फोन, कार्ड किंवा इतर कोणत्याही गोष्टीशिवाय फक्त हात स्कॅन करून पैसे देताना दिसत आहे.


**कसं काम करतं हे तंत्रज्ञान?**

ही सिस्टम थशउहरीं ने विकसित केली आहे. मे २०23 मध्ये बीजिंग एअरपोर्ट एक्सप्रेस ट्रेन लाईन आणि शेन्झेन युनिव्हर्सिटीमध्ये हे पहिल्यांदा सादर करण्यात आलं. आता गुआंगडोंग प्रांतातील १,५०० हून अधिक ७-इलेव्हन स्टोअरमध्ये हे तंत्रज्ञान लागू करण्यात आलं आहे.

या तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी युजर्सना सर्वप्रथम त्यांच्या थशउहरीं अकाऊंटमध्ये रजिस्ट्रेशन करावं लागेल आणि त्यांचा हात स्कॅन सिस्टममध्ये सेव्ह करावा लागेल. यानंतर जेव्हा जेव्हा त्यांना पेमेंट करायचं असेल तेव्हा त्यांना फक्त त्यांचा हात स्कॅनरवर ठेवावा लागेल आणि पेमेंट होईल. हा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे, जो आतापर्यंत लाखो लोकांनी पाहिला आहे. सोशल मीडियावर भारत आणि चीनच्या डिजिटल पेमेंट तंत्रज्ञानाची तुलना सुरू झाली आहे.

# क्रांतिकारक दामोदर हरी चापेकर

हरिभाऊ चापेकर या एका कीर्तनकारांच्या घरी २५ जून १८६९ रोजी दामोदर चापेकर यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच टिळकांच्या विचारांचा प्रभाव दमोदर यांच्यावर होता. २२ जून १८९७ रोजी पुण्यातील गणेशखिंडीत दामोदरपंतांनी आणि त्यांच्या सहकार्यांनी वॉल्टर चार्ल्स रँड आणि आयर्स्टचा वध केला. इंग्रजांनी दामोदरपंतांना १८ एप्रिल १८९८ रोजी पुण्यातील येरवडा तुरूंगात फाशी दिली.



**निमित्त**

लहानपणापासूनच दामोदर चापेकर यांना व्यायामाची आवड होती. समवयस्क मित्रांना संघटित करून त्यांनी एक व्यायामशाळा सुरू केली. इंग्रजांकडून करण्यात येणार्या अत्याचाराची दामोदरपंतांना मनस्वी चीड होती. दामोदरपंतांचे लहान भाऊ बाळकृष्ण हरि चापेकर व वासुदेव हरि चापेकर दोघेही त्यांच्या प्रत्येक कार्यात सहभागी होत होते.

या तिन्ही भावांना चापेकर बंधू नावाने ओळखले जाते. हे तिन्ही भाऊ लोकमान्य टिळक यांच्या संपर्कात होते. टिळकांना ते गुरू मानत असत. त्यांचे वडील हरिपंत हे पुणे व मुंबई येथे हरिकथा सांगायचे. बालवयात तिघेही भाऊ हरि कीर्तनात वडिलांना मदत करायचे. त्यामुळे चापेकर बंधूंच्या शिक्षणात खंड पडला. विठ्ठलभक्ती करणार्या या मराठी कुटुंबाने देशासाठी प्राण अर्पण करणारे ३ तरणीबांड मुलेही दिली.

पुण्यामध्ये १८९७ मध्ये प्लेगची साथ आली. प्लेगपीडित रुग्णांना शोधून उपचार करण्याच्या नावावर इंग्रजांनी पुण्यातील घराघरात शोध मोहीम उघडली आणि अत्याचाराचा कहर केला. यामुळे इंग्रजांविरोधात असंतोष पसरू लागला. तत्कालीन जिल्हाधिकारी वाल्टर चार्ल्स रँड हा अत्यंत क्रूर, खुनशी होता. पुण्याच्या नागरिकांवर अत्याचार करण्यात तो सर्वात पुढे होता. बाळ गंगाधर टिळक आणि आगरकर यांनी या अत्याचाराविरोधात टीका केली. यामुळे त्यांना जेलमध्ये टाकण्यात आले. दरम्यान, दामोदरपंतांनी रँडची हत्या करण्याची योजना आखली. २२ जून १८९७ रोजी पुण्यातील गणेशखिंडीत रँड आणि त्याचा सहकारी लेफ्लनंट आयस्टर यांची एका कार्यक्रमाहून परतत असताना गोळ्या झाडून हत्या केली.

गणेश आणि रामचंद्र या द्रविड बंधूंनी केलेल्या गद्दारीमुळे इंग्रजांना हल्लेखोरांची नावे कळाली आणि त्यांनी दमोदरपंतांना अटक केली. त्यानंतर काही दिवसातच बाळकृष्ण व वासुदेव चापेकर, तसेच महादेव रानडे या सर्वांनाच पकडण्यात आले. इंग्रजांनी दामोदरपंतांना १८ एप्रिल १८९८ रोजी पुण्यातील येरवडा तुरुंगात फाशी दिली.

दामोदर चापेकर यांचे कार्य भारतीय स्वातंत्र्य चळवळीत एक महत्त्वाचे योगदान होते आणि त्यांनी राष्ट्रीय विचारांना प्रोत्साहन दिले. दामोदर चापेकर यांनी स्वतःचे आत्मचरित्र लिहिले होते, परंतु ते त्यांच्या ताब्यात ठेवले गेले. येरवडा तुरुंगात असताना त्यांनी आपला जीवन प्रवास आणि क्रांतीकार्याचे तपशील नमूद करणारे १०० पानी आत्मवृत्त मोडीत लिहून काढले. ते वि.गो.खोबरेकर यांनी संपादित करून मराठीत आणले. १९७४ साली ते राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई या संस्थेने प्रकाशित केले.

(साभार : इंटरनेट)


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# उन्हाळ्यात सतत एसीमध्ये बसल्यामुळे वाढतो मायग्रेन

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये सर्वच घरांमध्ये पंखा, एसी, कुलर इत्यादी गोष्टी वापरल्या जातात. यामुळे उष्णता कमी होऊन थंड वारे लागतात.घरोघरी आणि ऑफिसमध्ये एसी दिवसभर सुरू असलेले आपण पाहतो. उन्हाच्या तीव्र झळाळीपासून आराम मिळण्यासाठी एसीची थंडगार हवा उपयुक्त ठरते. पण, मायग्रेन असणाऱ्या व्यक्तीने एसीची हवा घेऊ नये, असे सांगितले जाते. यामागचे नेमके कारण काय? हेच कित्येक जणांना ठाऊक नसते.



खरंतर, मायग्रेनचा त्रास हल्ली तरुणांपासून ते वयोवृद्धापर्यंत सर्वांनाच आहे. मायग्रेन ही एक प्रकारची तीव्र डोकेदुखी आहे, जी लवकर थांबत नाही. आवाज, भूक, स्ट्रेस, झोपेचा अभाव हवामानात अचालक बदल यामुळे मायग्रेनचा त्रास सुरू होतो. त्यामुळे मायग्रेनचा त्रास असणारी व्यक्ती जेव्हा एसीच्या संपर्कात येते तेव्हा हा त्रास आणखी वाढू शकतो. त्यामुळे मायग्रेनचा त्रास असल्यास एसीमध्ये बसणे टाळावे. एसीच्या थंड हवेमुळे डोकेदुखी वाढण्याची शक्यता असते. एसीची थंड हवा थेट डोक्यावर पडल्यास किंवा चेहऱ्यावर आल्यास नसा आकुंचन पावतात आणि वेदना आणखी तीव्र होण्यास सुरूवात होते. एसीमध्ये जास्त वेळ राहिल्याने डिहाड्रेशनचा त्रास होऊ शकतो, ज्यामुळे डोकेदुखी वाढू शकते.

एसीमुळे हवेतील आर्द्रता कमी होते, ज्यामुळे डोकेदुखी वाढते. एसीमुळे डोळे कोरडे होतात, ज्यामुळे डोळ्यांवरील ताण वाढतो, जो मायग्रेनला ट्रिगर करू शकतो. एसीचे तापमान जास्त थंड ठेवू नये. एसीची नियमितपणे साफ करणे. डोकेदुखी सुरु झाल्यावर भरपूर विश्रांती घ्यावी. पौष्टिक आणि संतुलित आहार घ्यावा. एसीमुळे हवामान जास्त कोरडे असल्यास ह्युमिडिफायरचा वापर करावा. एसीच्या हवेमुळे डोळे कोरडे होतात, तज्ञांच्या सल्ल्याने डोळ्यांमध्ये ओलावा कसा टिकून राहील यावर उपाय जाणून घ्यावेत. स्ट्रेस कमी करण्यासाठी योगा, ध्यान, मेडिटेशनसारख्या सवयी अवलंबवा. तुम्ही ऑफिसमध्ये काम करत असाल तर अधूनमधून बाहेर जाऊन सूर्यप्रकाश घ्यावा.

मायग्रेनमुळे डोकेदुखीची समस्या तीव्र झाल्यानंतर अनेक लॉक्ड डॉक्टरांच्या सल्ल्याने गोळ्या औषध घेतात. मात्र वारंवार गोळ्या खाणे आरोग्यासाठी घातक ठरते. मायग्रेनची समस्या उद्भवू लागल्यानंतर घरगुती उपाय करू सुद्धा आराम मिळवता. आल्याच्या चहाचे सेवन केल्यामुळे तीव्र डोके दुखीपासून आराम मिळतो. याशिवाय आहारात मसाल्यांच्या पदार्थांचे सेवन केल्यामुळे तात्काळ आराम मिळेल.

# निडी फाटक व बोगद्यासंदर्भात खा. धैर्यशील पाटील यांची सूचना



**रोहे : प्रतिनिधी**

पावसाळ्यात बोगद्यातील पाणी पंपाने न निघाल्यास त्यावेळी निडी ग्रामस्थांच्या रहदारीसाठी गेट उघडुन देण्यात यावे असे सांगत गेट जवळ लावण्यात आलेले प्लेअर ब्लॉक काढु नये.ग्रामस्थांना रहदारीसाठी गैरसोय होवु नये अशी खबरदारी रेल्वे प्रशासनाने घ्यावी अशा सुचना रेल्वे अधिकाऱ्यांना खासदार .धैर्यशील पाटील यांनी दिल्या

रोहा तालुक्यातील निडी तर्फे अष्टमी ग्रामपंचायत हद्दीतील निडी येथील रेल्वे फाटक व रेल्वे बोगदा या संदर्भात रोहा प्रांताधिकारी कार्यालयात निडी ग्रामस्थांच्या तक्रारी व उद्भवणाऱ्या समस्या बाबत खासदार धैर्यशील पाटील यांनी बैठक बोलावली होती.या बैठकीस प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, तहसीलदार किशोर देशमुख, रेल्वेचे अधिकारी व निडी ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी ग्रामस्थांच्यावतीने बोगद्यातील पाणी काढण्यासाठी पंप लावावे त्यासाठी रेल्वेने कायमस्वरूपी कर्मचारी नेमावे, बोगद्यात लाईट व्यवस्था करावी, पावसाळ्यात पाण्याचा निचरा झाला नाही तर गेट उघडावे, गेट जवळील प्लेअर ब्लॉक काढू नये यासह अन्य मागण्या यावेळी बैठकीत प्रशासनासमोर मांडल्या. प्रांत अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड् यांनी उर्वरित कामे रेल्वे प्रशासनाने पूर्ण करावे असा सूचना दिल्या.यावेळी रेल्वे प्रशासनाच्यावतीने उपस्थित अभियंता याने नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

# तळा तालुक्यातील सरपंचपदाचे आरक्षण होणार जाहीर

## २३ एप्रिल रोजी सोडत

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील २५ ग्रामपंचायतींचे सरपंच पदाचे आरक्षण २३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी डॉ.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती तळा येथे काढण्यात येणार आहे.

तळा तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्याकरीता कार्यक्रम जाहिर करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने तळा तालुक्यातील सन. २०२५-२०३० या कालावधी करीता सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करणेकामी उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांचे अध्यक्षतेखाली २३ एप्रिल रोजी सभा आयोजित करण्यात आली आहे.

सदर सभेमध्ये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार सरपंच पदे आरक्षित करण्यात येणार आहेत. तरी या सभेस नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन तहसिलदार स्वाती पाटील यांनी केले आहे.

**CHANGE OF PRACTICING ADDRESS**

Name = Dr Sandeepa L Patil
State* Reg No = GB- I -24241
Teacher's code = AYSV00659

I am currently practicing at Mandsaur Institute of Ayurvedic Education and Research,PO Mandsaur, Pin-458001, Madhya Pradesh, since 19 April 2024.

**CHANGE OF PRACTICING ADDRESS**

Name Dr. Monarani Chaurasia
State* Reg No = I-20173-A1
Teacher's code = AYRB01475

I am currently practicing at Mandsaur Institute of Ayurvedic Education and Research,PO Mandsaur, Pin-458001, Madhya Pradesh,since 18 Feb 2025

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-वाशिवली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ९/२/ब | ०-१६-०० <br> पो.ख. ०-०३-०० <br> **एकूण - ०-१९-००** | २.५० | **श्री. कृष्णा झिपऱ्या पाटील <br> श्री. राम झिपऱ्या पाटील <br> श्रीमती ज्योती विठ्ठल माळी <br> श्रीमती भागीरथी झिपऱ्या पाटील** |
| ५/२६ | ०-५०-४० <br> पो.ख. ०-०३-०० <br> **एकूण - ०-५३-४०** | ७.७५ | **श्री. विष्णु महादु ठोंबरे** |
| ५/२५/अ | ०-७०-०० <br> पो.ख. ०-१२-४० <br> **एकूण - ०-८२-४०** | १२.०३ | **श्री. हरिभाऊ तुकाराम शिवळे** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १४/०४/२०२५.**

**सही/-**
**ॲड. श्री. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१

# पनवेल महानगरपालिका

## वैदयकीय आरोग्य विभाग

स्थापना - २०१६

**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल -४१०२०६.**

**दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३ वैद्यकीय आरोग्य विभाग : ०२२ - २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९**
**ई-मेल : mohpmc05@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com**

**जा.क्र./पमपा/वै.आ.वि.का./ ५६० /सन २०२५-२६** **दिनांक:- १७/०४/२०२५**

## पदभरती जाहिरात

**वाचा :-**

१. मंजुर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२४-२५ नुसार मंजुर पदे
२. महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई यांचे क्र. मपवैप/ आसे/ पदभरती/ ३३६/ २०२२ दि.२१.१२.२०२२ रोजीचे पत्र
३. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं.राआसो /मनुष्यबळ कक्ष/सुधारित पदभरती समिती /१०२६६-१०६००/२०२३ दि.२६.०४.२०२३ रोजीचे पत्र
४. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /१०६७०-११०१६/२०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्र.
५. सहाय्यक संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांचे जा.क्र. रानाआअ/शैक्षणिक पात्रता/ एनयुएचएम/२४००४-२४१८७/२३ दिं २४.०५.२०२३ रोजीचे पत्र.
६. शासन निर्णय क्र. बीसीसी-२०२४/प्र. क्र.७५/१६- क दि. २७/०२/२०२४
७. मा. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील पत्र जा.क्र. राआसोमुं / मनुष्यबळ/ कं.पदभरती/२७४१५-६६३/२०२४ दि.३.०७.२०२४
८. मा. आयुक्त महोदयांची मंजुर टिपणी दि. १.०४.२०२५

पनवेल महानगरपालिका, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत रिक्त असलेल्या पदांची पदभरती प्रक्रियेसाठी खालील दर्शविल्याप्रमाणे निव्वळ कंत्राटी स्वरूपात करार पध्दतीने मानधन तत्वावर नियुक्ती करावयाची आहे. तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज पनवेल महानगरपालिका, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय आरोग्य विभाग, सिडको समाज केंद्र, सेक्टर २१, कामोठे, पनवेल ४१०२०६, येथे दिनांक १७.०४.२०२५ ते ३०.०४.२०२५ या कालावधीत सादर करावेत.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत पनवेल महानगरपालिकेकरीता रिक्त पदांच्या पदभरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचनांनुसार राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार मंजुर पदांपैकी रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात https://www.panvelcorporation.com या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | कार्यक्रमाचे नाव | रिक्त पदे | आरक्षणानुसार जात प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापक** (PHM) | राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान | ०१ | एकाकी पदास आरक्षण लागु नाही. | MBBS or Graduate with Health Science BDS / BAMS / BHMS/ BUMS / B.PTH/Nursing Basic / (P.B.B.sc) B.Pharm + MPH / MHA / MBA in Health Care Administration with Preference will be give to experienced person | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | **रूपये ३२,०००/- प्रतिमाह** |
| २ | **प्रयोगशाळा तंत्रज्ञ** (Lab Technician) | राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम | ०१ | एकाकी पदास आरक्षण लागु नाही. | 12 + Diploma with Maharashtra Paramedical Council Registration <br> 1) DPU Dr.D.Y. Patil Vidyapeeth, pune (Deemed Univsersity) (Under Section 3 of the UGC Act, 1956) <br> 2) Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik (Established by Govt. Of Maharashtra ) <br> 3) Maharashtra State Board of Technical Education, 49, Kherwadi, Bandra (E) Mumbai. <br> 4) Shreemati Nathibai Damodar Thackersey, Women's University, Mumbai- 400049. <br> 5) Maharashtra University of Health Sciences, Nashik, India. <br> 6) Tata Institute of Social Science,Devnar, Mumbai. | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | **रूपये १७,०००/- प्रतिमाह** |

अर्जदारांच्या गुणांकनानुसार निवड सुचीमधील पात्र उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेनुसार वरील प्रसिध्द केलेल्या रिक्त पदांवर नियुक्ती दिली जाईल व उर्वरीत पात्र उमेदवारांची पदनिहाय प्रतिक्षायादी ठेवण्यात येईल. भविष्यात रिक्त होणाऱ्या पदावर या पदनिहाय प्रतिक्षायादी मधील उमेदवारांमधुन त्यांच्या गुणवत्ते प्रमाणे उमेदवारांना नियुक्ती दिली जाईल. सदर प्रतिक्षायादीचा वैधता कालावधी निवड यादी प्रसिध्द केल्यापासुन केवळ १ वर्ष राहील.

**अर्जदाराची वयोमर्यादा-**

१) अर्ज भरण्याच्या दिनांकास उमेदवाराचे वय जाहिरातीमध्ये विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.
२) मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दि. २८ मे २०१९ रोजीच्या पत्रानुसार रूग्ण सेवेशी संबंधित पदांची वयोमर्यादा ६५ वर्षा पर्यंत राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरीता कमाल सेवा प्रवेश मर्यादा ०५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल. वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडुन प्राप्त केलेले शारिरीक दृष्टया व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

**अर्ज भरण्याबाबतच्या सुचना -**

१) उमेदवाराने स्वत:चे पूर्ण नाव माध्यमिक शालांत प्रमाणपत्राप्रमाणे अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.
२) माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीख अर्जात अचुक नमूद करावी.
३) जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष ) अचूक नमुद करावे.
४) अर्जदार ज्या पदासाठी अर्ज करत आहे त्या पदाचे नाव विहित नमुन्यातील अर्जावर सुस्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे.
५) अर्जात उमेदवाराचे लिंग व वैवाहिक दर्जा या बाबतची माहिती नमूद करावी.
६) महिला अर्जदार विवाहित असल्यास, व त्यामुळे त्यांच्या नावात बदल झाला असेल तर विवाह नोंदणी प्रमाणपत्र **(Marriage Registration Certificate)** किंवा नावात बदल झाल्यामुळे (Govt. Gazette) मध्ये असा बदल जाहिर केल्याचे शासकीय राजपत्रामधील (Govt. Gazette) अर्जदाराचे नाव असलेल्या पानाची स्व - साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
७) अर्जामध्ये उमेदवाराने स्वत:चा वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे.
८) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे, असल्यास त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.
९) उमेदवाराने अर्जामध्ये आपला जात, धर्म हा तपशील अचूकपणे नमूद करावा.
१०) इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, या प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांनी अर्जासोबत त्यांचे जात-प्रमाणपत्र/ जात वैधता प्रमाणपत्र व वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
११) अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायम स्वरूपी पत्ता तसेच ई- मेल व मोबाईल नंबर अर्जामध्ये अचूक नमूद करावा.
१२) अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. याबाबतचे अर्जासोबतचे विहित नमुन्यातील अर्जदाराने स्वाक्षरी केलेले हमी पत्र सादर करावे. अर्जासोबत या हमीपत्राचा नमुना देण्यात आलेला आहे.
१३) अर्ज विहित नमुन्यात टंकलिखीत / स्वहस्ताक्षरात, स्वसाक्षरीने व सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपुर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
१४) अर्जदाराला ज्या ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे, त्या त्या पदासाठी स्वतंत्रपणे अर्ज सादर करणे बंधनकारक आहे.

**शैक्षणिक अर्हता/पात्रता-**

१) अर्जामध्ये शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.
२) अर्जदाराकडे जाहिरातीमध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता असणे आवश्यक आहे.
३) अर्ज भरत असताना पात्रता परिक्षेत मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुण व गुणांची टक्केवारी, अर्जातील नमुद टक्केवारीशी न जुळल्यास, असे अर्ज नामंजूर करण्यात येतील. ग्रेड किंवा श्रेणी यांचे रूपांतर गुणांच्या टक्केवारीमध्ये करण्यासाठी आवश्यकता भासल्यास अर्जदाराने त्यांचे महाविद्यालय किंवा विद्यापिठ यांचे सहकार्य घ्यावे.
४) अर्जदारांनी अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिकेची छायांकित स्वसाक्षांकित प्रत व इतर आवश्यक ती सर्व प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.
५) पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त शिक्षण मंडळ, शैक्षणिक संस्था, शिक्षण परिषद विद्यापीठ यामधुनच प्राप्त केलेली असणे बंधनकारक आहे..
६) अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल. त्यामुळे ही माहिती अपुरी किंवा चुकीची असु नये याची खबरदारी अर्जदाराने घ्यावी.

अनुभव -

१) शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा शासकीय व निम शासकीय संस्थांमधील केवळ पदाशी संबंधीत क्षेत्रातील अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यामुळे अर्जदाराने शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करू नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.
२) अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना अर्जदाराने शासकीय व निम शासकीय संस्थेच्या अनुभव प्रमाणपत्रामधील दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर अनुभवाचा कालावधी अनुभव -प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.
३) ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव ग्राहय धरण्यात येणार नाही.

**संगणक अर्हता-**

१) MS - CIT प्रमाणपत्र किंवा तत्सम पात्रता धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा व त्याबाबचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे.

लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र-

१. लहान कुटुंबाची अट दि. २३/०७/२०२० पासुन लागू करण्यात आली असून दि.२३/०७/२०२० पासुन दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.
२. विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अर्जदाराने अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.

**अर्ज शुल्क -**

१) अर्जदाराने अर्जासोबत अर्ज शुल्कासाठी कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१००/- असे अर्जाचे शुल्क राहील. त्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष पुढील नावे काढावा. INTEGRATED HEALTH AND FAMILY WELFARE SOCIETY PANVEL
२) अर्जदाराला ज्या ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे, त्या प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे उपरोक्त नमुद केल्यानुसार धनाकर्ष अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.
३) राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षा व्यतिरिक्त इतर कोणत्याही बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) स्विकारला जाणार नाही. धनाकर्षा शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. असे अर्ज अपात्र करण्यात येतील, याची प्रकर्षाने नोंद घ्यावी.

**उमेदवारांचा फोटो व स्वाक्षरी-**

१) उमेदवाराने अर्जावरील फॉर्म वर फोटोकरीता राखीव ठेवलेल्या जागेवर त्यांचा अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.
२) अर्जदाराने स्वाक्षरी साठी राखीव ठेवलेल्या जागेत स्वाक्षरी करावी.

**निवड प्रक्रिया-**

या निवड प्रक्रियेसाठी मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /१०६७०-११०१६/२०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचना पुढील प्रमाणे :-

१) सदर पदभरतीच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या अर्जदारांच्या अर्जामधील गुणवत्तेनुसार / गुणांकन पद्धतीने (Merit) निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. या संदर्भात सर्व अधिकार मा. अध्यक्ष, निवड समिती यांनी राखून ठेवले आहेत.
२) उमेदवाराची निवड शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार गठित करण्यात आलेल्या निवड समितीच्या मान्यतेने, मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि.१७/०३/२०२२ रोजीच्या पत्रातील निकषानुसार १:३ व १:५ या प्रमाणामध्ये उमेदवारांची निवड गुणांकन पद्धतीने (चशीळीं) करण्यात येईल. उमेदवाराची निवड करताना पदवी/पदविका परीक्षेतील अंतिम वर्षाचे गुण, अतिरिक्त शैक्षणिक अर्हता, अनुभव विचारात घेऊन खालील तक्त्यानुसार गुणांकन यादी तयार करण्यात येईल.

**गुणांकन पद्धती खालीलप्रमाणे:-**

| अ.क्र | विवरण | तपशील | अधिक्तम गुण |
|---|---|---|---|
| १ | १ पदासाठी आवश्यक Qualifiying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारी ५० प्रमाणे Propottion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion= ६०*५०/१००=३०) <br> (अधिकत्तम ५० गुण) | ५० गुण |
| २ | पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतेपक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | (अधिकत्तम २० गुण) <br> मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Propottion काढावे. (उदा. अतिरिक्त शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे Propottion = ६०*२०/१००=१२ गुण) | २० गुण |
| ३ | संबंधित पदाशी निगडित अनुभव | प्रत्येक वर्षासाठी ६ गुण <br> (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण देता येतील.) | ३० गुण |
| | | **एकुण** | **१०० गुण** |

३) सदरील गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येणार असुन त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश E- Mail द्वारे / टपालाद्वारे पाठविणेत येतील.
४) गुणांकन पद्धतीनुसार (Merit) भरण्यात येणाऱ्या पदांकरीता कोणत्याही प्रकारची मुलाखत घेण्यात येणार नाही.
५) समान गुण प्राप्त झाल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवारांना प्राप्त गुण व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडित अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
६) गुणांकन पद्धतीने निवड झालेल्या उमेदवारांची निवड यादी व निवडीस पात्र असलेल्या उमेदवारांची प्रतिक्षा-यादी पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
७) उमेदवाराने अर्जामध्ये नमुद केलेला ई-मेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू राहील याची दक्षता घ्यावी व त्यासाठी वेळोवेळी ई-मेल तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

**सर्वसाधारण सुचना-**

१) सदर पदभरती प्रक्रिये बाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी www.panvelcorporation.com या संकेस्थळास वेळोवेळी भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे या बाबतची जबाबदारी संबंधीत अर्जदाराची राहिल. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.
२) जाहीरातीत नमूद केलेले पद हे पूर्णत: कंत्राटी स्वरुपाचे असून ते राज्यशासनाचे नियमित पद नाही, या पदाचा राज्य शासनाच्या पदाशी काहीही संबंध नसून उमेदवार भविष्यात राज्य शासनाच्या नियमित पदावर समायोजन करण्याची मागणी करु शकणार नाही.
३) जाहीरातीत नमूद केलेल्या पदाचे मानधन हे एकत्रित मासिक ठोक मानधन आहे.
४) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर सुट्टीचे दिवस वगळुन ७ दिवसांच्या आत नियुक्तीचे ठिकाणी सेवे मध्ये रूजु होणे अनिवार्य राहिल. उमेदवाराने निवडीसाठी कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल व प्रतिक्षाधिन यादीमधील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.
५) अर्ज भरतांना अराखीव प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांनी अर्जा सोबत खालील (१ ते १४) कागदपत्रे व प्रमाणपत्रे जोडावीत.

वरील पदांसाठी संकेतस्थळावरील विहित नमुन्यातील अर्ज व त्या संबंधीची कागदपत्रे व प्रमाणपत्रे उपरोक्त वरील अटी व शर्तीनुसार पनवेल महानगरपालिका, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय आरोग्य विभाग, सिडको समाज केंद्र, सेक्टर २१ कामोठे, पनवेल ४१०२०६ (शासकीय सुट्टीचे दिवस वगळुन) या पत्त्यावर दिनांक १७.०४.२०२५ ते ३०.०४.२०२५ या काल-ावधीत सकाळी ११.०० ते सायं ४.०० वाजेपर्यत सादर करावेत. विहित मुदतीत टपालाने, कुरीअरने व स्वहस्ते अर्ज स्विकारले जातील.

अर्जदाराने त्यांच्या विहित नमुन्यातील पुर्ण माहिती भरलेल्या अर्जासोबत खालील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.

१) वयाचा पुरावा
२) शैक्षणिक अर्हतेसंबंधी सर्व आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे - उदा. पदवी/पदविका प्रमाणपत्र (Diploma / Degree Convocation )
३) पात्रता परिक्षेची गुणपत्रिका (सर्व वर्षांच्या गुणपत्रिका)
४) प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदासाठी उमेदवाराचे महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र अनिवार्य
५) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्रे व कागदपत्रे
६) आधारकार्डची झेरॉक्स प्रत, P-N Card उपलब्ध असल्यास त्याची छायांकित प्रत
७) अलिकडील फोटो (२ प्रती)
८) विवाहित महिला अर्जदाराने नावात बदल केला असल्यास त्याबाबत राजपत्राची (Govt. Gazette) छायांकित प्रत.
९) पुरुष उमेदवाराच्या बाबतीत नावामध्ये काही कारणांमुळे बदल केलेला असल्यास शासनाच्या राजपत्राची (Govt. Gazette) छायांकित प्रत.
१०) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
११) अर्जदारावर फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र
१२) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
१३) राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft)
१४) MS - CIT Certificate प्रमाणपत्र

सदर पदभरती मध्ये नमुद पदांच्या संख्येमध्ये कमी अधिक बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच पदभरती प्रक्रियेमध्ये आवश्यक्तेनुसार बदल करण्याचे व अंशतः किंवा पूर्ण रद्द करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष, निवड समिती, पनवेल महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत. कृपया याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

**(डॉ.आनंद गोसावी)**
**वैदयकीय आरोग्य अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

## अर्जाचा नमुना

**( --------------------------------या पदासाठी अर्ज )**

उमेदवाराचा नजीकच्या काळातील (रुंदी ३.५ से.मी व उंची ४.५. से.मी) आकाराचा फोटो चिकटवून स्वत: साक्षांकीत करावा

**प्रति,**
**मा.आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

१. संपूर्ण नाव (प्रथम आडनाव ) :----------------------------------------------
२. वडिलाचे / पतीचे नाव :----------------------------------------------
३. सद्या राहण्याचा पत्ता : ----------------------------------------------
४. भ्रमणध्वनी क्रमांक : (१) -------------------------------(२)-------------------------------
५. जन्मतारीख :---------------- दिनांक : / /२०२५ रोजीचे वय ---------------------- राष्ट्रीयत्व ----------------------
६. उमेदवार विवाहीत / अविवाहित :----------------------------------------------
७. (अ ) जात :----------------------- (ब) जात वैधता प्रमाणपत्र : आहे/ नाही. ८. धर्म :--------------- ९. ई- मेल आयडी :----------------------
१०. खाली नमुद केलेल्या प्रवर्गापैकी योग्य चौकोनात ( ✔ ) अशी खुण करावी.

| अ.जा. (SC) | अ.ज. (ST) | वि.जा. (अ) (VJ-A) | भ.ज. (ब) (NT-B) | भ.ज. ( क) (NT-C) | भ.ज. (ड) (NT-D | वि.मा.प्र. (SBC) | इ.मा.व (OBC) | ईडब्ल्यूएस (EWS) | एस.ई.बी.सी (SEBC) | खुला (OPEN) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

११. **शैक्षणिक अर्हता :-**

जसे MBBS or Graduate with Health Science BDS / BAMS / BHMS/ BUMS/B.PTH/Nursing Basic / (P.B.B.sc) B.Pharm/MPH/MHA/MBA in Health Care, 12 + Diploma with Maharashtra Paramedical Council Registration

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षांचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(स्वप्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)

१२. **अतिरिक्त अर्हता :-जसे पदवीत्तर**

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षांचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(स्वप्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)

१३. **अनुभव**

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्षे | सेवा सोडल्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |

(प्रमाणपत्राच्या प्रती)

१४. अवगत असणाऱ्या भाषा :

| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| बोलणे | | | |
| लेखन | | | |

१५. आपणा विरुद्ध न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालु आहे काय ?(असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा)
१६. अर्जासोबत खालील छायांकित सत्य प्रती जोडलेल्या आहेत. (जात वैद्यता प्रमाणपत्र व स्त्री उमेदवारांनी विवाहानंतर नावात बदल झाला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ नावात बदल झाल्याचे राजपत्र जोडणे बंधनकारक आहे.)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | २ | ३. | ४. |

१७. वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असनु ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुद्ध कायदेशिर कारवाई होईल यांची मला जाणीव आहे.

**ठिकाण :** **दिनांक :** **(अर्जदाराची स्वाक्षरी व नाव )**

## जेईई/नीट व एमएचटी-सीईटी परीक्षा


# अभ्यास होणार सुकर : मंत्री अतुल सावे

### 'महाज्योती'च्या पुस्तकसंच वाटप योजनेला उत्सफूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

विद्यार्थ्यांना जेईई/नीट व एमएचटी-सीईटी परीक्षेच्या तयारीसाठी आवश्यक असणारी शैक्षणिक साहित्याचा संच वितरित करून देण्यात येत आहे. राज्यातील विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रचंड प्रमाणात नोंदणी केली आहे. यामुळे जेईई/नीट व एमएचटी-सीईटी परीक्षेच्या तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा मार्ग अधिक सुकर होणार. असा विश्वास 'महाज्योती'चे अध्यक्ष तथा इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे व्यक्त केले आहे.

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्वायत्त असलेली महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) ही मूल्याधिष्ठ शिक्षणाचा प्रसार ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी काम करीत आहे. गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना 'महाज्योती'तर्फे दर्जेदार प्रशिक्षण मिळावे तसेच विद्यावेतनातून त्यांना अर्थसहाय्याचे पाठबळ देण्याचे मोलाचे कार्य संस्था करीत असल्यानेच आज राज्यातील हजारो विद्यार्थ्यांनी उतुंग यश प्राप्त केले आहे.



यावर्षी ओबीसी प्रवर्गातील ७ हजार पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना जेईई/नीट व एमएचटी-सीईटी परीक्षेच्या तयारीसाठी आवश्यक असणारी शैक्षणिक साहित्याचा संच वितरित करून देण्यात येत आहे. 'पुस्तक संच वाटप योजने'चा लाभ घेण्यासाठी 'महाज्योती'ने राज्यातील ३६ जिल्ह्यातून अर्ज मागविले होते. राज्यातील विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रचंड प्रमाणात नोंदणी केली आहे.

पुढे बोलतांना मंत्री अतुल सावे म्हणाले की, 'महाज्योती' द्वारे एमएचटी-सीईटी, जेईई, नीट, संघ लोकसेवा आयोग (युपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी), पायलट ट्रेनिंग, पीएचडी स्कील डेवलपमेंट आदिंचे विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात येत आहे. यावर्षी जेईई/नीट व एमएचटी-सीईटी परीक्षेची तयारी करणाऱ्या 'महाज्योती'च्या विद्यार्थ्यांना त्यांच्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत हा आहे. त्यानुसार 'पुस्तक संच वाटप योजने' अंतर्गत राज्यातील ३६ जिल्ह्यांमधून 'महाज्योती'च्या प्रशिक्षणासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचा संच दिले जात आहे. या नोंदणीत जळगाव विभागातून सर्वाधिक विद्यार्थी सहभागी झाले असून, त्याचबरोबर अमरावती, धुळे, बुलढाणा, अहिल्यानगर आणि इतर जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे.

'महाज्योती'च्या योजनेला मिळालेला उदंड प्रतिसाद पाहून खूप समाधान वाटते. या उपक्रमामुळे ओबीसी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळते आणि त्यांचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत होते. अशा योजनांचा लाभ घेण्यासाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी पुढे यावे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा माझ्याकडून मी देत असल्याचेही मंत्री अतुल सावे म्हणाले.

राज्यातील ओबीसी, व्हिजेएनटी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना गेल्या सहा वर्षांपासून दर्जेदार प्रशिक्षण तसेच विद्यावेतनातून त्यांना अर्थसहाय्याचे पाठबळ देण्याचे मोलाचे कार्य संस्था करीत आहे. 'महाज्योती'द्वारे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रमाच्या जोरावर घवघवीत यश प्राप्त केले आहे. जेईई/नीट व एमएचटी-सीईटी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आलेल्या 'पुस्तक संच वाटप योजने'ला विद्यार्थ्यांकडून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हे 'महाज्योती'च्या उल्लेखनीय कार्याची पावती आहे, असा विश्वास 'महाज्योती'चे प्र. व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी व्यक्त केले.

# तळोजा वसाहतीमधील उघड्या वीजपेट्या बनल्या धोकादायक

**पनवेल : वार्ताहर**

शाळेला सुट्टी पडल्यामुळे सकाळ-संध्याकाळ विविध खेळ खेळण्यासाठी मुले मैदानाकडे धाव घेत आहेत; मात्र तळोजा सेक्टर-१० मधील मैदानातील खेळणी मोडकळीस आली आहेत. मैदानाभोवती लावण्यात आलेली लोखंडी जाळी गायब झाली असून, मैदानाला लागून असलेल्या वीजपेटी, ट्रान्स्फॉर्मर उघड्या अवस्थेत न असल्यामुळे मुलांना धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पालिकेने मैदानातील खेळणी दुरुस्त करून मैदानाभोवती जाळीची सोय करावी, अशी मागणी रहिवाशांकडून केली जात आहे.

सिडकोने तळोजा सेक्टर-१० येथील भूखंडावर खेळाचे मैदान विकसित केले आहे. परिसरात हे एकमेव मोठे मैदान आहे. सध्या शाळेला सुट्टी पडल्यामुळे विविध खेळ खेळण्यासाठी परिसरातील मुलांची मैदानात गर्दी असते; मात्र मैदानातील सर्व खेळणी मोडकळीस आली आहेत. मैदानात कचरा साचला आहे. मैदानात सिडकोने उभारलेले सर्व पथदिवे अनेक दिवसांपासून बंद असल्यामुळे काही तरुण रात्रीच्या वेळी अमली पदार्थांचे सेवन करीत असल्याचे परिसरातील नागरिकांकडून सांगितले जात आहे.

या मैदानाभोवती लावण्यात आलेली लोखंडी जाळी गायब झाली आहे. मैदानाला लागून असलेल्या वीजपेटी, ट्रान्स्फॉर्मर उघड्या अवस्थेत असल्यामुळे मुलांना धोका निर्माण होऊ शकतो. मैदानाला लागूनच वीजपुरवठा करणार्यासाठी ट्रान्स्फार्मर बसविण्यात आले आहेत. ट्रान्स्फार्मरच्या बाजूला असणार्या वीजपेट्या उघड्या अवस्थेत आहेत. मैदानात मुले क्रिकेट खेळत असतात. खेळताना चेंडू उघड्या वीजपेटीत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही अनुचित प्रकार घडल्यास त्यास कोण जबाबदार, असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे. पालिकेने मैदानातील खेळणी दुरुस्त करून मैदानाभोवती लोखंडी जाळी बसविण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# ऐरोलीतील बांधकामावर महापालिकेची कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत एफ-२१६ , सेक्टर ३, ऐरोली येथील बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे केलेले होते. अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते, परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविले नसल्याने सदरचे अनधिकृत बांधकाम आज ११ एप्रिल २०२५ रोजी अतिक्रमण मोहिम राबवून सदर बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले आहे.

या मोहिमेसाठी ऐरोली विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी सुनील काठोळे, कनिष्ठ अभियंता संदिप म्हात्रे, जी विभाग ऐरोली येथील अधिकारी, कर्मचारी तसेच अतिक्रमण पोलिस पथक उपस्थित होते. मोहिमेकरीता एक गॅस कटर, दोन हॅमर व आठ मजूर यांचा वापर करण्यात आलेला आहे. यापुढेदेखील अशा प्रकारे कारवाई करण्यात येणार आहे.

## उरण येथे प्रथमच आउटडोर समर कॅम्प; मुलांचा प्रतिसाद

**उरण : वार्ताहर**



उरण येथे प्रथमच आउटडोर समर कैंप चे आयोजन शिल्पा प्रशांत म्हात्रे यांनी आंगन रिसोर्ट ,क्षत्रिय सोमवंशी पाठारे हॉल समोर नागाव ,येथे करण्यातआले आहे .शिबिर १५ एप्रिल ते २६ एप्रिल पर्यंत ४ ते १५ वर्षे वयोगटातील मुले,मुली यांच्या साठी आहे . सुट्टी मध्ये मुले मोबाइल पासून दूर राहून त्यांचा शारीरिक अणि मानसिक विकास याज बरोबर .सर्वांगीण विकास व्हावा हा उद्देश आहे असे शिल्पा म्हात्रे यांनी सांगितले .

घर हे संस्काराचं पहिलं केंद्र. ते संस्कारकेंद्रच धावत्या जगामुळे उध्वस्त होत चालल्याने बालमनावर घरात संस्कार होणे कमी झाले आहे. त्यामुळे अशा संस्कार शिबिराची मोठ्या प्रमाणात गरज आहे.

शिबिरात सुसंस्कारासह मुलांच्यातील कला कौशल्य विकसित होतील . , मुलं मोबाईल पासून, व्यसनापासून दूर राहतील. पुस्तकं हातात घेतील. आधुनिक ज्ञानासह थोरा-मोठ्यांचे विचार आत्मसात करतील. जे जे सत्य आहे, जे जे शिव आहे, जे जे सुंदर आहे ते ते स्वीकारतील. साधी राहणी,उच्च विचारसरणी अंगीकारतील.नम्रता, प्रेम, शांती या शाश्वत नीतिमूल्यांतून त्यांचा सर्वांगाने विकास होईल. आणि.. या गुणांच्या जोरावर आपला भवताल अधिक सुरक्षित करून सर्वांगसुंदर जीवन जगत त्यांच्या ध्येयापर्यंत आनंदाने पोहोचतील. असा आम्हास विश्वास वाटतो.

## नवी मुंबई महापालिकेतर्फे विद्याभवन संकुलाचा उत्कृष्ट शैक्षणिक कार्यासाठी सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**



पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलास उत्कृष्ट शैक्षणिक कार्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने वाशी येथे आयोजित केलेल्या एका दिमाखदार सोहळ्यात सन्मानित केले.

महाराष्ट्र शासनातर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमात पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाने सामूहिकरित्या केलेल्या यशस्वी कामगिरीबद्दल शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील टप्पा-१ मध्ये ठाणे जिल्ह्यातून तृतीय क्रमांक (पारितोषिक रक्कम रु. ३ लक्ष) तसेच २०२४-२५ मधील टप्पा-२ मध्ये जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाचे ११ लक्ष रुपयांचे पारितोषिक प्राप्त केल्याबद्दल नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आमदार मंदाताई म्हात्रे, ज्येष्ठ कवी प्रा. अशोक बागवे, नवी मुंबई महानगरपालिका सचिव चित्रा बाविस्कर, उपआयुक्त (शिक्षण) संघरत्ना खिल्लारे आणि शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांच्या शुभहस्ते वरील दोन्ही वर्षांसाठी दोन गौरवचिन्हे प्रदान करण्यात आली.

यावेळी संस्थेचे कुलसचिव दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सुवर्णा मिसाळ, शिक्षिका कविता तेंडुलकर, मेघाराणी जोशी, नूतन गवांदे, आरती औचर, राधिका भोसले, सुलेखा खराडे, विद्यार्थी विभूती गुंजाळ व वेदांत यादव यांना सन्मानपूर्वक स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले.

संस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष सुभाष जिर्गे व अमोल जोशी, कार्यवाह संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष कृष्णाजी कुलकर्णी व इतर संस्था पदाधिकारी यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

## नवीन घडविण्याची क्षमता असतो तोच शिक्षक होतो - प्रा.अशोक बागवे

**नवी मुंबई : बातमीदार**

शिक्षक गुणगौरव सोहळ्याच्या निमित्त आयोजित विशेष व्याख्यानात सुप्रसिध्द कवी, साहित्यिक प्रा. अशोक बागवे यांनी 'गुरु' या शब्दाची उकल करीत शिक्षकाचे समाजातील महत्व विविध गोष्टी सांगत अधोरेखीत केले. विविध कविता, अभंग यांचे दाखले देत त्यांनी चांगले विद्यार्थी घडविणे हे शिक्षकाचे 'सेफ डिपॉजिट वॉल्ट' असल्याचे सांगितले.

'नवीन काहीतरी घडविण्याची क्षमता असतो तोच शिक्षक होतो' असे सांगत त्यांनी महाराष्ट्राचे व देशाचे भविष्य मुलांच्या रुपात घडविण्याची संधी शिक्षकांना लाभली आहे त्याचे सोने करावे असे आवाहन केले. शिक्षकाने मुलांच्या मनातले ओळखले पाहिजे, जो ते ओळखतो तो मुलांचा आवडता शिक्षक होतो हे लक्षात घेऊन तसा शिक्षक बनण्याचा प्रयत्न करा असे ते म्हणाले.

अभिजात मराठी भाषेचा अभिमान अविष्कृत करताना प्रा. अशोक बागवे यांनी भावना घेऊन जी भाषा येते, ती आपली भाषा म्हणूनच मला बोलीभाषा आवडतात असे सांगत 'जी नष्ट होत नाही, जी अक्षय आहे, ती अभिजात' अशा शब्दात मराठी भाषेचा गौरव केला.

कार्यक्रमाचा प्रारंभ शाळा क्र. १५, शिरवणे मधील विद्यार्थांनी सुरेल स्वागत गीताने केला. शाळा क्र.४२, घणसोलीच्या शिक्षिका शोभा बुक्कानुरे यांनी पुरस्कारप्राप्त शिक्षकांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरुपात आपल्या भावना व्यक्त केल्या.



## 'टीआयएसएस'च्या विद्यार्थ्यांची नवी मुंबई मनपा मुख्यालयास अभ्यास भेट

**नवी मुंबई : बातमीदार**



टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई यांच्या आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक्रमातील ३० विद्यार्थ्यांनी प्रा. महेश कांबळे यांच्या नेतृत्वाखाली नवी मुंबई शहराची आपत्ती निवारण क्षमता आणि प्रगत नागरी नियोजन या विषयी माहिती जाणून घेण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयाला भेट दिली.

यावेळी महानगरपालिकेचे सहा. संचालक नगररचना सोमनाथ केकाण यांनी या विद्यार्थी समुहाला नवी मुंबई शहराच्या निर्मितीपासूनचा इतिहास कथन करीत यापुढील काळात सन २०३८ पर्यंतचे नियोजन विषयी सविस्तर माहिती दिली. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, नागरी नियोजनाचे निकष, सिडकोचा विकास आणि विकास योजना मंजूरी प्रक्रिया याविषयीही माहिती दिली.

अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांनी नवी मुंबई महापालिकेची पाणीपुरवठा व मलनि:स्सारण यंत्रणा या विषयी सविस्तर माहिती दिली. तसेच, नवी मुंबईला पूरग्रस्त होण्यापासून वाचविणारे होल्डिंग पॉंड्सचे (धारण तलाव) महत्व कार्यप्रणालीसह विशद केले.

त्याचप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेची घनकचरा व्यवस्थापन प्रणाली कार्यक्षम राहून कशा पध्दतीने प्रभावी काम करते याचे सविस्तर विवेचन सोमनाथ केकाण यांनी देत शंकाचे समाधान केले.

विद्यार्थ्यांनी नेरुळ येथील अत्याधुनिक त्रिस्तरीय जलशुद्धीकरण प्रकल्पाला भेट देउन विद्यार्थ्यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या अद्ययावत पायाभूत सुविधांची आणि भविष्यातील नियोजनाची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

## वाहन नोंदणीतून आरटीओच्या महसुलात लक्षणीय वाढ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वाहन नोंदणी प्रक्रियाच्या माध्यमातून, नवी मुंबईतील वाशी परिवहन कार्यालयाच्या तिजोरीत लक्षनीय वाढ झाली आहे. मागील वर्षी म्हणजे आर्थिक वर्ष २०२३-२४मध्ये ३५८ कोटी रू जमा झाले आहेत, तर २०२४-२५मध्ये ३९२,कोटी ४८ लाख रुपये जमा झाले आहेत. यानुसार यावर्षी ३४ कोटी ५७ लाख रुपये महसूल अधिक जमा झाला आहे.

गेल्या काही वर्षात वाहन कर्ज घेणे सहज सोपे झाले असल्याने सर्वसामान्य नागरिकांनाही वाहन खरेदी सोपी झाली आहे. त्यामुळे प्रत्येक घराच्या बाहेर आत्ता एक तरी गाडी उभी असलेली पाहायला मिळतेच. यानुसार नवी मुंबईत दरवर्षी वाहनांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. २०२३ - २४ मध्ये १८५७४ दुचाकींची आणि १०६११ चारचाकीची भर पडली आहे. तर २४-२५ या वर्षात २००१७ दुचाकींची तर ९६३७ चार चाकी गाड्यांची नोंदणी झाली आहे. याचं प्रमाणे २२०९ आणि २२२४ रिक्षांची भर दोन वर्षात पडली आहे.

## शिक्षकामध्ये मार्गदर्शनासह नेतृत्व घडवण्याची ताकद -आमदार मंदा म्हात्रे

**नवी मुंबई : बातमीदार**

शिक्षक म्हणजे केवळ एक विषय शिकवणारा व्यक्ती नाही, तर तो एक मार्गदर्शक, प्रेरणास्थान आणि व्यक्तीमत्व घडवणारा असतो. समाजात योग्य संस्कार रुजवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाचे बीज पेरण्यासाठी शिक्षकाचे योगदान अमुल्य असते याच अनुषंगाने आज वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे नवी मुंबई महानगरपालिका आयोजित शिक्षक गुणगौरव सोहल्याचे दीप्रज्वलन बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.



या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, आज आपण या मंचावर एकत्र आलो आहोत आपल्या शाळेतील गुणवंत शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी हे केवळ त्यांचे कौतुक करण्याचेच नव्हे तर त्यांच्या परिश्रमांना दिलेले एक अभिमानाचे उत्तर आहे. शाळेच्या यशात विद्यार्थ्यांच्या यशस्वी भविष्यात शिक्षकांची भूमिका मोलाची असते. अनेकदा आपल्या मागे उभा राहून प्रत्येक पायरीवर मार्गदर्शन करणारा शिक्षक या यशाचा खरा शिल्पकार असतो. त्याच बरोबर शिक्षकाच्याच हाताने राज्य घडते असे ही आमदार म्हात्रे यांनी सांगितले.

उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल विविध शाळांना सन्मानचिन्ह देऊन आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी माझ्या समवेत प्रवक्ते सुप्रसिद्ध कवी व साहित्यक अशोक बागवे,नवी मुंबई महानगरपालिका उपायुक्त संघरत्ना खिल्लारे, नवी मुंबई महानगरपालिका शिक्षणाधिकारी अरुणा यादव, नवी मुंबई महानगरपालिका सचिव चित्रा बाविस्कर तसेच शिक्षक संख्येने उपस्थित होते.

# माणगाव उपजिल्हा रुग्णालयाला उपकरणे भेट

## ◆ डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानची अनोखी सेवा

**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा ता.अलिबाग यांच्यातर्फे माणगाव उपजिल्हा रुग्णालयास २५ लाख रुपये किमतीच्या विविध वैद्यकीय उपकरणांचे वाटप गांधी मेमोरियल हॉल, निजामपूर रोड येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आले.




माणगाव हे मुंबई-गोवा महामार्गावरील तालुक्याचे मध्यवर्ती ठिकाण असून याठिकाणी प्रशस्त असे उपजिल्हा रुग्णालय आहे. या रुग्णालयात महामार्गावर घडणाऱ्या अपघातातील जखमींना औषोधोपचारासाठी दाखल करण्यात येते तसेच दक्षिण रायगडातील माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, महाड,पोलादपूर आदी तालुक्यांतून गरीब रुग्ण औषोधोपचारासाठी येत असतात. याठिकाणी गरिबांना चांगली सेवा मिळावी हा उद्देश नजरेसमोर ठेवून सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून समाजात काम करणाऱ्या डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे या उपजिल्हा रुग्णालयास वैद्यकीय उपकरण यांचे वाटप करण्यात आले.

रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ.महेश मेथा यांच्याकडे तालुक्याचे तहसीलदार दशरथ काळे, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी, उपविभागीय कार्यालयाचे कर्मचारी श्री.पाचाडकर, उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.मृणालीनी वाढवळ, डॉ.सानप, लता राठोड, परिचारिका शिवकांती गवळी, शर्मिला गोडबोले,संजय देसाई यांच्या उपस्थितीत श्री सदस्य सुरेश वाढवळ, संदीप खरंगटे, नितीन बामगुडे, नितीन वाढवळ, अपर्णा वाढवळ यांनी उपकरणे सुपूर्द केली.

या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना तहसीलदार दशरथ काळे यांनी, डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करताना प्रतिष्ठानने माणगाव उपजिल्हा रुग्णालयास दिलेल्या आवश्यक अशा वैद्यकीय उपकरणांचा गरीब जनतेला निश्चितच याचा फायदा होणार असून हे प्रतिष्ठान वेगवेगळे उपक्रम सामाजिक दायित्वातून समाजासाठी राबवित असल्याचे सांगितले.

रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ.महेश मेथा यांनी बोलताना डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानने माणगाव उपजिल्हा रुग्णालयास वस्तुरूपी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले आहे. आम्ही जी यादी दिली होती त्यापेक्षा अधिक साहित्य आमच्या रुग्णालयास प्रतिष्ठानतर्फे देण्यात आले आहे. या रुग्णालयात आपण श्री सदस्यांना जे काही सहकार्य लागेल ते देण्यासाठी आम्ही सहकार्य करू, असे सांगितले.

प्रास्ताविकात आदर्श शिक्षिका अपूर्वा जंगम यांनी रायगड जिल्ह्यात रेवदंडा येथे डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या रूपाने ज्ञान सूर्य उगवला असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने श्री सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन जंगम यांनी केले.

# आंबेवाडी ते निवी कालवा दुरूस्तीचा खासदार सुनील तटकरे घेणार आढावा

## बळीराजा फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा

**धाटाव : प्रतिनिधी**

कोलाड पाटबंधारेच्या आंबेवाडी ते निवी कालव्याची दुरुस्ती कामांचा आढावा घेण्याबाबत बळीराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, संस्थापक राजेंद्र जाधव यांनी खासदार सुनील तटकरे यांच्याशी दूरध्वनीवरून केली. त्याला प्रतिसाद देत खासदार तटकरेंनी येत्या दोन-तीन दिवसात तातडीने चर्चात्मक बैठक घेण्याचे ठोस आश्वासित केले. त्यामुळे बळीराजा फाऊंडेशनचे शेतकरी, विभागीय ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.



आंबेवाडी ते निवी कालव्याची दुरुस्ती कामे दोन तीन वर्षे सुरू आहेत. दुरुस्ती कामे संपता संपेनात. त्यामुळे पाण्याची अद्याप शाश्वती नाही. या वर्षी वाशी, तळाघर, लांढर हद्दीतील कालव्याची दुरुस्ती कामे सुरू आहेत. एप्रिल मध्यान्ह आला तरी कामांना वेग नाही. त्यामुळे पाटबंधारे प्रशासनाचे नेमके चाललेय काय, मेअखेर तरी कालव्याला पाणी सोडणार का ? असा सवाल कालव्याच्या पाण्यासाठी अविरत लढा देणाऱ्या बळीराजा फाऊंडेशनने केला आहे.

दरम्यान, कालव्याचे पाणी, दुरुस्ती कामांवर बळीराजा फाऊंडेशनची पहिलीच चर्चा खासदार सुनील तटकरेंच्या दरबारात होणार आहे. कालव्याच्या दुरुस्ती कामांचा आढावा घेतला जावा, दुरुस्ती कामांची पाहणी दौरा करावा, असे निवेदन बळीराजा फाऊंडेशनने खासदार तटकरे यांना देणार आहे.

दूरध्वनीवर झालेल्या चर्चेत शनिवारी अथवा रविवारी आढावा चर्चात्मक बैठक घेण्याचे सांगण्यात आले. निवेदनात कालव्याची दुरुस्ती कामे मुख्यतः पाण्याबाबतची गरज व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे आश्वासित बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# माणगावमध्ये ईद मिलन कार्यक्रम उत्साहात

## कुरआन विश्व बंधूत्वाचा संदेश देतो -डॉ. रफिक पारणेकर

**माणगाव : प्रतिनिधी**

रमजान हा मुस्लिम धर्मियांचा पवित्र महिना ओळखला जातो. या महिन्यात कुरआन अवतरले असून कुरआन विश्व बंधूत्वाचा संदेश देतो, असे प्रतिपादन भारतीय समाज विभाग जेआयएच महाराष्ट्र सचिव डॉ.रफिक पारणेकर यांनी माणगाव येथील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.



जमाअते इस्लामी हिंद रायगड (कोकण) व फलाही तंझीम माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ईद मिलन कार्यक्रमाचे शानदार आयोजन करण्यात आले होते. अत्यंत उत्साहात हा कार्यक्रम झाला. त्या वेळी ते बोलत होते. त्यांनी रोजा, कुरआन, मानवजात, विश्व बंधूत्व आदी गोष्टींवर मौलिक असे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी, राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार, माणगाव व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी लक्ष्मण दळवी, माणगाव पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन मदनलाल जैन, डॉ.परेश उभारे, रमेश जैन, नगरसेवक अजित तारलेकर, सामाजिक कार्यकर्ते किशोर झेमसे,राकेश सदानंद जाधव, भूषण सिसोदे, प्राची झेमसे आदींसह विविध जाती धर्मातील समाज बांधव-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात हाफिज अब्दुल मुसव्वीर यांनी कुरआन पठणाने करून केली. सूत्रसंचालन व आभार वकीलूउद्दीन इनामदार यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जमाअते इस्लामी हिंद रायगड (कोकण) व फलाही तंझीम माणगाव यांच्या पदाधिकारी व सभासदांनी विशेष परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात १० मे रोजी राष्ट्रीय लोक अदालत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यात १० मे रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल शिंदे यांनी दिली.

लोक अदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रकरणे तसेच ग्रामपंचायतीच्या घरपट्टी व पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूरसंचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका व पतसंस्था व इतर वित्तीय संस्थांच्या थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात येतात. यासाठी सहकार्य करावे व अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड ए. एस. राजदेकर यांनी केले आहे.

# भाग्येश जैनला एमबीबीएस पदवी प्रदान

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड शहरातील भाग्येश मुकेश जैन याला वैद्यकीय क्षेत्रातील महत्त्वाची एमबीबीएस ही पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली आहे. वेदांता इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स पालघर-डहाणू येथे त्याने ही पदवी प्राप्त केली.




मुलुंडच्या महाकवी कालिदास ऑडिटोरियममध्ये विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, डॉ.मिहिर कोटेचा, कॉलेजच्या डीन डॉ. शुभांगी पारकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार डॉ. मुकुंद खंडेलवाल यांच्या हस्ते भाग्येश जैनला ही पदवी प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमास डि. जे.मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. एकनाथ पवार, डॉ. अमोल घुले, डॉ. राहुल घुले, डॉ. भाग्येशचे आजोबा मुरुडमधील उद्योजक ललितकुमार जैन, आजी फॅन्सी जैन, आई प्रविणा जैन, चुलते योगेश जैन आदी उपस्थित होते. डॉ. हितेश जैन यांचा भाग्येश हा पुतण्या आहे. भाग्येशचे या यशाबद्दल अभिनंदन होत आहे.

# खोपोली लॉ कॉलेजमध्ये डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. बाबासाहेबांनी तयार केलेल्या संविधानाच्या माध्यमातून दलित समाजाचा उद्धार झालाच; त्याबरोबर सर्वांना संविधानिक अधिकार मिळाल्याचे प्राचार्य वर्षा घारे यांनी बोलताना सांगितले.

प्रारंभी प्राचार्य घारे यांनी बाबासाहेबांच्या पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर प्रा.वैशाली मुके, प्रा.तनिष्का देशमुख तसेच महाविद्यालयातील स्टाफ आर्चना पाटील, अंजूम शेख विद्यार्थी केविना गायकवाड, संदीप ओव्हाळ रब्बानी खान यांनी फुले वाहून अभिवादन केले.

कार्यक्रमाचे सुंत्रसचालन अभिजीत देशमुख यांनी केले, तर आभार संजिवनी भोसले यांनी मानले.



# महामानवाला विनम्र अभिवादन



**चौक : प्रतिनिधी**

भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती खालापूर तहसील कार्यालयात साजरी करण्यात आली.

या वेळी तहसीलदार अभय चव्हाण यांच्या हस्ते पुष्पमालिका अर्पण करण्यात आली. नायब तहसीलदार विकास पवार, अधिकारी, कर्मचारी यांनीही महामानवाला अभिवादन केले.

# दुचाकी व चारचाकी वाहनांना आकर्षक तसेच पसंतीच्या क्रमांकासाठी अर्ज सादर करावेत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. यासाठी ज्यांना दुचाकी व चारचाकी वाहनांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क भरुन हवे असतील त्यांनी २२ एप्रिल रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते दुपारी २.३० या दरम्यान विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या खासगी वाहन विभागात डीडी, निवासी पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल यांनी केले आहे.

एकाच नंबरकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी २२ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. त्यानुसार एकाच नंबरसाठी एकापेक्षा जास्त अर्ज असतील तर त्या अर्जदारांनी त्याची नोंद घेऊन २३ एप्रिल रोजी कार्यालयीन वेळेत दुपारी २.३० वाजेपूर्वी त्यांच्या इच्छे प्रमाणे जास्तीच्या रक्कमेचा डीडी बंद लिफाफ्यामध्ये कार्यालयात जमा करावा अतिरीक्त धनाकर्षण कमीत कमी ३०९ रु.चा असावा त्यापेक्षा कमी रकमेच्या धनार्पिणचा विचार केला जाणार नाही. अर्जासाठी त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नवीन वाहन नोंदणी विभाग यांच्या दालनात लिलाव करण्यात येईल.

सदर डीडी RTO P-NVEL यांच्या नांवे नॅशनलाईज्ड/शेक्युल्ड बँकेचा असावा तसेच तो दोन महिन्यांपेक्षा जास्त जुना नसावा. अर्जादाराने अर्जासोबत पॅनकार्ड व आधारकार्ड साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य राहील. लिलावाकरिता जमा करण्यात येणारा डीडी (फक्त एकच डीडी) या सीलबंद पाकीटात जमा करावा. आकर्षक क्रमांकासाठी आलेल्या अर्जासोबत असणारे घनाकर्षण अर्ज स्विकारणाऱ्या दिवसापासून दोन महिन्यापेक्षा जुने असलेलले धनाकर्षणाचे अर्ज बाद केले जातील. तसेच विहित शुल्कापेक्षा कमी रकमेचे असलेले डीडी सुद्धा बाद केले जातील. एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून १८० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर केले नाही तर राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही अथवा त्याचे समायोजन करता येणार नाही.

# खोपोली 'अंनिस'तर्फे संविधान घर जनजागृती

**खोपोली : प्रतिनिधी**

अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा खोपोलीच्या वतीने दोन दिवस शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासमोर संविधान घर या जनजागृतीपर उपक्रमाचे आयोजन नगर परिषदेच्या सहकार्याने करण्यात आले. हा उपक्रम सम्राट अशोक, महात्मा जोतिराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवाच्या निमित्ताने 'सामाजिक समता सप्ताह' अंतर्गत राबविण्यात आला.




भारताचे संविधान हे भारतीय लोकशाहीची आधारशीला आहे. त्यातील मूलभूत मूल्ये जनमानसात पोहचविणे व त्यासंबंधी जनजागृती निर्माण करणे हे अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्याचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. हाच उद्देश लक्षात घेता कलात्मक सादरीकरणाच्या माध्यमातून समाजाच्या प्रत्येक स्तरात संविधानाविषयक जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न संविधान घर या उपक्रमाद्वारे करण्यात आला.

या संविधान घरात भारतीय संविधानाचे स्रोत, त्याच्या निर्मितीचा प्रवास, संविधान निर्मितीत महिलांचा सहभाग, आणि संविधानाची प्रस्तावना सोप्या व समजेल अशा भाषेत फोड करून दाखविण्यात आली होती तसेच भारतीय नागरिकांचे मूलभूत हक्क व कर्तव्ये, मार्गदर्शक तत्त्वे, संविधान सभेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेवटचे भाषण व त्यातील निर्वाणीचा इशारा, संविधानाची प्रत, आणि कवी पाश यांची 'सबसे खतरनाक' ही विद्रोही कविता यांची आकर्षक मांडणी करण्यात आली होती.

उपक्रमाचे उद्घाटन माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे आणि उपमुख्याधिकारी रणजीत पवार यांच्या हस्ते अभिनव संकल्पनेतून झाले. उद्घाटनावेळी भारतीय लोकशाहीचे खांब अधिक मजबूत करण्याच्या हेतूने संविधान मान्यवरांच्या हस्ते घरात स्थापित करून 'हर घर संविधान, हर मन संविधान' या संकल्पनेतून झाला.

कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये सामाजिक कार्यकर्ते श्याम कांबळे, जनता विद्यालय खोपोलीचे अध्यक्ष कैलास गायकवाड, माजी नगरसेवक. किशोर पानसरे, 'अंनिस' रायगड जिल्ह्याचे माजी अध्यक्ष यशवंत गायकवाड, खोपोली शाखा अध्यक्ष डॉ. सुभाष काटकदौंड, उपाध्यक्ष निशा दळवी, जिल्हा कार्याध्यक्ष संदीप गायकवाड, महिला सहभाग विभाग कार्यवाह सुविधा गायकवाड, नागरी सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा वर्षा मोरे, युवा उद्योजक विक्रम साबळे, सामाजिक कार्यकर्ते, उदय गायकवाड, पत्रकार जगन्नाथ ओव्हाळ, भालेराव यांचा समावेश होता.

संविधान घर दलित मानवाधिकारांचे ज्येष्ठ कार्यकर्ते मार्टिन मखवाना यांच्या संकल्पनेतून स्फूर्ती घेऊन तयार करण्यात आले होते. संविधान घरासोबतच संविधान चौकाची उभारणीदेखील या वेळी करण्यात आली तसेच सुनील अवच्छर यांनी साकारलेली महापुरुषांच्या आद्यक्षरांची जातीभेद विरोधी एबीसीडी चित्रस्वरूपात दाखविण्यात आली.

संविधान घरासमोर उभारण्यात आलेल्या बुक स्टॉलमधून विविध पुस्तकांची मोठ्या प्रमाणात विक्री झाली. या उपक्रमाला खोपोलीतील नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. संविधान घराला भेट देणाऱ्या सर्व नागरिकांना संविधानाची उद्देशिका भेट म्हणून देण्यात आली. या वेळी अनेक मान्यवरांनी भविष्यात खोपोलीत केंद्रस्थानी संविधान चौकाची उभारणी व्हावी, असे मत मांडले.

उपक्रमास मुख्याधिकारी पंकज पाटील, पोलीस निरीक्षक शीतल राऊत, माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, माजी नगरसेवक मोहन औसरमल यांनी आवर्जून हजेरी लावली. याशिवाय नगर परिषदेचे निलेश लोखंडे व गजानन जाधव यांचे विशेष सहकार्य मिळाले.

# वाघोबा मंदिराचा वर्धापन दिन साजरा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पोशीर ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या वाघ्याचीवाडी येथे असणाऱ्या वाघोबा मंदिराचा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहाने पार पडला. वाघ्याचीवाडी येथे असणाऱ्या वाघोबा मंदिर या मंदिराला शंभर वर्षाची परंपरा लाभली असून दरवर्षीप्रमाणे मंदिरात सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले होते. देवपाडा, चिंचवाडी, वाघ्याची वाडी, उंबरवाडी, गिऱ्यावाडी या सर्व गावातील ग्रामस्थ या पूजेला हजर होते. प्रामुख्याने यात लहान मुले, तरुणवर्ग, महिला यांचा सहभाग होता. पंचक्रोशीतील सुमारे दोन हजार भाविकांनी या सोहळ्याला आपली हजेरी लावली.



वाघोबा मंदिर हे पांडवकालीन असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात येत आहे. पूर्वी हे मंदिर कौलारू पद्धतीने बांधले गेले होते, मात्र मागील वर्षी माजी सरपंच हरिश्चंद्र निरगुडा यांच्या विशेष प्रयत्नाने तसेच ग्रामस्थ कृष्णा झोमटे आणि विष्णू झोमटे यांच्याकडून आर्थिक सहकार्य लाभल्याने कळशाचे मंदिर बांधण्यात आले. सकाळी वाघोबा देवाची नित्यनियमाची पूजा विधी करून संध्याकाळी सत्यनारायण पूजा करण्यात आली. वाघोबा मंदिर हे ग्रामदैवत असून दरवर्षी चैत्र महिन्यात सत्यनारायण पूजेचा आयोजन केले जाते. पुढील वर्षांपासून दोन दिवस जत्रा भरवण्याचे नियोजन सु आहे, अशी माहिती ग्रामस्थ कृष्णा झोमटे यांनी दिली.

# दिल्ली कॅपिटल्सचा 'सुपर' विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

तब्बल चार वर्षांनंतर आयपीएलमध्ये झालेल्या सुपर ओव्हर सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने राजस्थान रॉयल्सवर मात केली. दोन्ही संघांनी २० षटकांत १८८ धावा केल्याने सामना सुपर ओव्हरमध्ये गेला होता.

सुपर ओव्हरमध्ये राजस्थानने प्रथम फलंदाजी केली, परंतु मिचेल स्टार्कने केवळ ११ धावांच दिल्या. राजस्थानचे दोन फलंदाज पाच चेंडूतच बाद झाल्याने एक चेंडू शिल्लक राहिला. त्याआधी दिल्लीकडून के.एल. राहुल आणि त्रिस्टन स्टब्ज फलंदाजीस आले. राहुलने पहिल्या तीन चेंडूत २, ४ आणि १ अशा ७ धावा काढल्या. स्ट्राईकवर आलेल्या स्टब्जला ३ चेंडूंत ५ धावा करायच्या होत्या. त्याने मिडविकेटवरून उत्तुंग षटकार ठोकून विषय संपवला.



२० षटकांच्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने दिलेल्या १८८ धावांच्या टार्गेटचा पाठलाग करताना संजू सॅमसन व यशस्वी जैस्वाल यांनी राजस्थानला दमदार सुरुवात करून दिली, पण फटकेबाजीच्या प्रयत्नात संजूच्या खांद्यात चमक भरली. प्राथमिक उपचार घेऊनही त्याच्या वेदना कमी झाल्या नाही आणि त्याने मैदान सोडण्याचा निर्णय घेतला. संजूने १९ चेंडूंत दोन चौकार व तीन षटकारांच्या मदतीने ३१ धावा केल्या होत्या. त्याने यशस्वीसह ६१ धावा जोडल्या. त्यानंतर फलंदाजीला आलेला रियान पराग (८) अक्षर पटेलच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला. यशस्वीने एक बाजू लावून धरत ३७ चेंडूंत तीन चौकार व चार षटकारांसह ५१ धावा केल्या. नितीश राणाने आक्रमक फटकेबाजी करून २६ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले आणि राजस्थानला विजयासमीप पोहचवले.

१८व्या षटकात अक्षरने त्यांचा अनुभवी गोलंदाज मिचेल स्टार्कला पुन्हा आणले आणि त्याने विकेट मिळवून दिली. अप्रतिम यॉर्करवर नितीश बाद झाला. त्याने २८ चेंडूंत सहा चौकार व दोन षटकारांसह ५१ धावांची खेळी केली. १२ चेंडूंत २३ धावांची गरज असताना मोहित शर्माच्या षटकांत १४ धावा निघाल्या. त्यामुळे शेवटच्या षटकात नऊ धावांचे रक्षण करण्याची जबाबदारी स्टार्कवर आली. त्याने पहिल्या चार चेंडूंवर सहा धावा दिल्या. पाचव्या चेंडूवर एक धाव आल्याने एक चेंडू दोन धावा असा सामना चुरशीचा झाला. ध्रुववर प्रचंड दडपण होते आणि त्याला एकच धाव घेता आली. दुसरी धाव घेताना तो धावचित झाला. त्यामुळे हा सामना सुपर ओव्हरमध्ये गेला.

तत्पूर्वी, दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना ५ बाद १८८ अशा धावा केल्या. जॅक फ्रेझर मॅकगर्क (९) व करुण नायर (०) या विकेट राजस्थानने लवकर मिळवल्या, पण अभिषेक पोरेल (४९) व लोकेश राहुल (३८) यांनी चांगली भागीदारी केली, परंतु त्यांच्या धावगतीला अपेक्षित वेग नव्हता. कर्णधार अक्षर पटेलने १४ चेंडूंत चार चौकार व दोन षटकारांसह ३४ धावा चोपल्या. त्यानंतर त्रिस्टन स्टब्स व आशुतोष शर्मा यांनी मोर्चा सांभाळला. स्टब्स १८ चेंडूंत दोन चौकार व दोन षटकारांसह ३४ धावांवर नाबाद राहिला. शर्मा १५ धावांवर नाबाद राहिला आणि दिल्लीने पाच बाद १८८ धावांपर्यंत मजल मारली.



# पेण येथे कराटे प्रशिक्षण शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

पेण येथे युनायटेड शोतोकान कराटे असोशिएशन इंडियातर्फे शिहान रवींद्र म्हात्रे यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय येथे तीन दिवसीय कराटे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात रेन्शी डॉ. मंदार पनवेलकर यांच्या अध्यक्षतेखाली ब्लॅक बेल्ट व कलर बेल्टची परीक्षा घेण्यात आली.


परीक्षेत विद्यार्थ्यांनी आपल्या क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन घडवले. मुलींमध्ये सलोनी सावंत, आर्या म्हात्रे, वेदा म्हात्रे, अएशा बेगम, श्रावणी म्हात्रे, श्रीधरा धर्बमुल्ला, स्वरा कामत; तर मुलांमध्ये ओमकार पाटील, निल पितळे, कौस्तुभ दास, अनुज म्हात्रे परीक्षा उत्तीर्ण झाले.

शिबिरात पेण नगर परिषदेच्या शाळेतील मुलींनीही सहभाग घेऊन प्रशिक्षण घेतले तसेच या शिबिरात बॉक्सिंग, थांग-ता, रायफल शुटींग, हार्सरायडींग, लाठीकाठी, कमांडो ट्रेनिंग आणि विविध मनोरंजक खेळ घेण्यात आले.

या वेळी प्रशिक्षक म्हणून संतोष खंदारे, पयुष सदार्वते, संजय पाटील, विनायक पाटील, प्रतीक करांडे, प्रथमेश मोकल, निलेश ओव्हाळ, अयूष रसाळ, संस्कार यादव, मनोज बोस्का, अशरफ अली, स्मित म्हात्रे, रितेष पवार, ओजस म्हात्रे, रविना म्हात्रे, प्राजक्ता तेटमे, हर्षाली पेणकर, भक्ती भानोस्कर, रितुल म्हात्रे, स्वरांगी घैसास यांनी काम पाहिले. सहभागी विद्यार्थ्यांना बेल्ट व सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले.

# पंजाब किंग्जला धक्का!

## वेगवान गोलंदाज फर्ग्युसन आयपीएलबाहेर



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंजाब किंग्ज संघाला मोठा धक्का बसला आहे. संघाचा वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसन दुखापतीमुळे संपूर्ण हंगामातून बाहेर पडला आहे. कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या सामन्यापूर्वी श्रेयस अय्यर आणि संघासाठी ही बातमी आली.

या संदर्भात पीबीकेएसचे जलद गोलंदाजी प्रशिक्षक जेम्स होप्स म्हणाले की, 'फर्ग्युसन अनिश्चित काळासाठी संघाबाहेर राहिल. तो स्पर्धेत कधी पुनरागमन करेल हे निश्चित सांगता येणार नाही. मला वाटते की त्याची दुखापत खूपच गंभीर आहे,

हैदराबादविरुद्धच्या सामन्यात फक्त दोन चेंडू टाकल्यानंतर फर्ग्युसन मैदानाबाहेर लंगडत गेला होता. त्या वेळी त्याने डाव्या मांडीला धरले होते. यानंतर चाचण्यांमध्ये त्याला गंभीर दुखापत झाल्याचे आढळले आहे.

# ग्रामीण प्रीमियर लीगमध्ये आमडोशी संघ विजेता

**नागोठणे : बातमीदार**

ग्रामीण क्रिकेट असोसिएशन आयोजित ग्रामीण प्रीमियर लीग पाटणसई येथील कै. देविदास गायकर क्रिडांगणात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत भावार्थ इंटरप्राईजेस आमडोशी (संघ मालक सोपान जांबेकर) संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेचे उद्घाटन नागोठणे भातगिरणी संस्थेचे अध्यक्ष सदानंद गायकर यांच्या हस्ते झाले. द्रितीय क्रमांक केबीजेसी वाघळी-हर्ष हॉटेल (संघ मालक तुकाराम कदम), तृतीय शरयू इंटरप्राईजेस वांगणी (संघ मालक एकनाथ ठाकूर) व चतुर्थ क्रमांक स्वराज इलेव्हन वांगणी (संघ मालक शेखर ठाकूर) यांनी मिळवला.



उत्कृष्ट फलंदाज व सिक्सर किंग विकास जाधव, उत्कृष्ट गोलंदाज व मॅन ऑफ दि सिरीज परेश म्हात्रे, मेन ऑफ दि मॅच तेजस बोरकर, उत्कृष्ट क्षेत्रक्षक नितेश कदम, उगवता सितारा म्हणून सुजल कदम आदी खेळाडूंना गौरविण्यात आले.

स्पर्धेदरम्यान राष्ट्रवादीचे नेते सदानंद गायकर यांच्या समवेत रोहा पं.स. सदस्य संजय भोसले, भाजप जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, माजी जिल्हा उपाध्यक्ष किशोर म्हात्रे, शिवसेना तालुका प्रमुख मनोज खांडेकर, भाजप तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर, पाटणसई माजी उपसरपंच पांडुरंग गायकर, वांगणी माजी सरपंच लहु तेलंगे, प्रियदर्शनी संस्थेचे माजी संचालक शेखर ठाकूर, वांगणी ग्रामपंचायत माजी सदस्य प्रमोद जांबेकर, प्रल्हाद राणे, तुकाराम कदम, राकेश शेलार, हेमंत गायकर, प्रकाश कदम, हरिश्चंद्र तेलंगे, मधुकर गायकर, दीपक महाडिक, सुभाष मढवी, मोतीराम गायकर, राजू राऊत ग्रामीण प्रिमियम लीगचे माजी अध्यक्ष प्रतिक गायकर, माजी उपाध्यक्ष मनोज वाजे, अध्यक्ष विश्वास गायकर, उपाध्यक्ष विकास ठाकूर आदी उपस्थित होते.

# बॉक्सिंग स्पर्धेत ओंकार पवारचे यश

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय बॉक्सिंग कौन्सिल आणि केरळ बॉक्सिंग कौन्सिल यांच्या वतीने कोल्लम बीच येथे राष्ट्रीय स्तरावरील बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नवी मुंबईतील घणसोली येथील बॉक्सर ओंकार पवार याने बाजी मारली.



स्पर्धेत विविध राज्यातील अनेक प्रतिभावान बॉक्सर खेळाडू मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ओंकार पवार याने दोन मिनिटे आणि तीन सेकंदांत पहिल्या बाद फेरीत जिद्द आणि चिकाटी याची सांगड घालत विजय मिळवला. या यशामुळे ओंकारचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

# अभिषेक नायरसह तीन सपोर्ट स्टाफला बीसीसीआयने हटवले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये टीम इंडियाची निराशाजनक कामगिरी आणि या मालिकेदरम्यान ड्रेसिंग रूममधील काही गोष्टी समोर आल्याची गंभीर दखल घेत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) मोठी कारवाई केली.

बीसीसीआयने भारतीय पुरुष संघाचे सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायर यांचा करार रद्द केला आहे. भारतीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक म्हणून नियुक्त केल्यानंतर एका वर्षापेक्षा कमी कालावधीत बीसीसीआयने त्यांना हटवले. याव्यतिरिक्त, क्षेत्ररक्षण प्रशिक्षक टी. दिलीप आणि स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग प्रशिक्षक सोहम देसाई यांनाही तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर जबाबदारीतून मुक्त करण्यात आले आहे.

# आयपीएल कामगिरीमुळे पाच खेळाडूंना मिळू शकते टीम इंडियात कमबॅकची संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदा काही क्रिकेटर आयपीएल गाजवत आहेत. या कामगिरीच्या जोरावर पाच खेळाडूंना भारतीय संघात पुनरागमनाची संधी मिळू शकते.

दिल्ली कॅपिटल्सच्या संघात असणाऱ्या करूण नायर याने धमाकेदार कामगिरीसह आयपीएलमध्ये धमाकेदार कमबॅक केले आहे. मुंबई इंडियन्स विरुद्धच्या सामन्यात त्याने ४० चेंडूत ८९ धावांची दमदार खेळी केली. देशांतर्गत क्रिकेटमध्ये धमाका केल्यावर आता आयपीलमधील कामगिरीसह पुन्हा टीम इंडियातील आपली दावेदारी भक्कम करताना दिसतोय. इंग्लंडविरुद्धच्या दौऱ्यासाठी त्याला टीम इंडियात संधी मिळू शकते. नायर याने २०१७मध्ये टीम इंडियाकडून अखेरचा सामना खेळला आहे.

मोहम्मद सिराज याला चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी निवडलेल्या संघात स्थान मिळाले नाही.



टीम इंडियातून बाहेर पडल्यावर मिळालेल्या ब्रेकमध्ये कठोर मेहनत घेत त्याने आयपीएलमध्ये छाप सोडलीये. सहा सामन्यातील १० विकेट्सह तो पुन्हा टीम इंडियात कमबॅकसाठी सज्ज दिसतोय.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील ३ ते ५ जानेवारी रोजी सिडनी कसोटीत सिराज भारतीय संघाकडून शेवटचा सामना खेळला होता. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतून वगळल्यावर तो अधिक घातक गोलंदाजीसह मैदानात उतरल्याचे दिसते.

२०२३मध्ये टीम इंडियात वनडे पदार्पणाची संधी मिळालेल्या साई सुदर्शन याने २०२४मध्ये टी-२० संघातही स्थान मिळवले, पण त्यानंतर तो संघाबाहेर झाला.

आयपीएलच्या यंदाच्या हंगामात गुजरात टायटन्स संघाकडून धमाकेदार कामगिरीसह त्याने टीम इंडियात कमबॅक करण्यासाठी दावेदारी ठोकल्याचे दिसते. साईने ७ जुलै २०२४ रोजी टीम इंडियाकडून अखेरचा टी-२० सामना खेळला होता.

आयपीएलमध्ये 'अनसोल्ड' राहिलेल्या शार्दुल ठाकूरला लखनऊच्या संघाने शेवटच्या क्षणी संघात दाखल करून घेतले. त्याने आपल्या गोलंदाजीतील धमक दाखवत पुन्हा एकदा टीम इंडियाचा दरवाजा ठोठावला आहे.

आयपीएल स्पर्धेनंतर होणाऱ्या इंग्लंड दौऱ्यावर त्याला टीम इंडियात संधी मिळू शकते. २६ डिसेंबर २०२३ रोजी शार्दुलने टीम इंडियाकडून दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शेवटचा कसोटी सामना खेळला होता.

दुखापतीमुळे टीम इंडियातून 'आउट' झालेला रियान परागलाही आयपीएलमधील लक्षवेधी कामगिरी करून पुन्हा टीम इंडियात कमबॅक करण्याची संधी आहे.

# विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाची स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाचीा ४६वी स्पर्धा कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठात १७ ते १९ एप्रिल या कालावधीत होत आहे. यामध्ये प्रामुख्याने ॲथलेटिक्स, कॅरम व व्हॉलीबॉल स्पर्धेचा समावेश आहे.

स्पर्धा महापारेषण, महानिर्मिती, महावितरण कंपनीच्या संयुक्त विद्यमाने होत आहेत. देशभरातून सुमारे एक हजार महिला व पुरुष खेळाडू यामध्ये सहभागी होणार आहेत, अशी माहिती महापारेषणच्या कराड परिमंडलाच्या मुख्य अभियंता तथा क्रीडा स्पर्धा आयोजन समितीच्या अध्यक्ष शिल्पा कुंभार यांनी दिली.

या स्पर्धेत दिल्ली, हरियाणा, गुजरात, राजस्थान, उत्तराखंड, तेलंगणा, बिहार, हिमाचल प्रदेश, टाटा पॉवर, पंजाब पॉवर, महापारेषण, महानिर्मिती, महावितरण कंपन्यांतील खेळाडू सहभागी झाले आहेत. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महापारेषणच्या कराड परिमंडल मुख्य अभियंता तथा क्रीडा स्पर्धा आयोजन समिती अध्यक्ष शिल्पा कुंभार, महावितरणचे मुख्य अभियंता स्वप्नील काटकर, महानिर्मितीचे मुख्य अभियंता संजय चोपडे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके (महावितरण), भरत पाटील (महापारेषण), पुरुषोत्तम वारजूरकर (महानिर्मिती), सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड, अधीक्षक अभियंता तथा सचिव प्रांजल कांबळे, शिरीष काटकर, प्रसाद निकम परिश्रम घेत आहेत.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com